**सुविचार**
यदि आप गलती करके स्वयं को सही सिद्ध करने का प्रयास करते हैं तो समय आपकी मूर्खता पर हँसा करेगा ।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. १३ एप्रिल २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१४६ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# जम्मू-काश्मीरला मिळेल पूर्ण राज्याचा दर्जा

उधमपूर : आगामी लोकसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी प्रचारासाठी उधमपूरला पोहोचले. याच दरम्यान मोदी म्हणाले की, जम्मू-काश्मीरला त्यांचा राज्याचा दर्जा परत मिळेल आणि केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुका होतील ही वेळ दूर नाही. भाजपाने उधमपूरमधून केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांना उमेदवारी दिली आहे.




नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात म्हटले की, कमकुवत काँग्रेस सरकारने शाहपूर कंडी धरण १० वर्षे प्रलंबित ठेवले. त्यामुळे जम्मूतील गावे कोरडी पडली होती. काँग्रेसच्या काळात रावीतून बाहेर पडणारे आमच्या हक्काचे पाणी पाकिस्तानात जात होते. जेव्हा लोकांना त्यांचे वास्तव कळले, तेव्हा जम्मू-काश्मीरमध्ये भ्रमाचे मायाजाळ चालणार नाही.

१० वर्षात आम्ही दहशतवादी आणि भ्रष्टाचा-यांवर कारवाई केली आहे आणि आता येत्या ५ वर्षांत या राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जायचे आहे. गेल्या १० वर्षांत जम्मू-काश्मीर पूर्णपणे बदलले आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे जम्मू-काश्मीरचे मन बदलत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये आता शाळा जाळल्या जात नाहीत, त्या बांधल्या जातात, असे पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात म्हटले आहे. त्यांनी काँग्रेसवर घराणेशाहीचा आरोप केला आहे. कलम ३७० बाबत पंतप्रधान म्हणाले, तुमच्या आशीर्वादाने मोदींनी ३७० चा ढिगारा जमिनीत गाडला आहे. मी काँग्रेसला ३७० परत आणण्याचे आव्हान देतो. जम्मू-काश्मीरमध्ये सत्तेसाठी ३७० ची भिंत बांधण्यात आली.

ही निवडणूक म्हणजे देशात मजबूत सरकार बनवण्याची निवडणूक असल्याचे पंतप्रधान म्हणाले. एक मजबूत सरकार आव्हानांमध्ये काम करते. आज गरिबांना मोफत रेशनची गॅरंटी आहे. १० वर्षांपूर्वी काश्मीरमधील गावांमध्ये वीज, पाणी आणि रस्ते नव्हते. मोदींची गॅरंटी म्हणजे गॅरंटी पूर्ण होण्याची गॅरंटी आहे. आज तुमच्या आशीर्वादाने मोदींनी आपली गॅरंटी पूर्ण केली आहे. आज दहशतवाद, सीमेपलीकडून गोळीबार, दगडफेक हे या निवडणुकीचे मुद्दे नाहीत. देशाच्या कानाकोप-यात पुन्हा एकदा मोदी सरकार हाच आवाज येत आहे असेही नरेंद्र मोदींनी म्हटले आहे.

# लोकसभा निवडणूक प्रक्रियेवर विविध २८ पथकांची नजर

लातूर : प्रतिनिधी- लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीची अधिसूचना दि. १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध झाली आहे. त्या अनुषंगाने प्रसार माध्यमांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी वर्षा ठाकुर-घुगे यांनी या निवडणुक प्रक्रियेवर विविध २८ पथकांची करडी नजर असणार असून निवडणुक भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे सांगितले.



येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, उपजिल्हा निवडणुक अधिकारी डॉ. भारत कदम, लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपजिल्हाधिकारी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. लोकसभा निवडणुकीच्या संपूर्ण प्रक्रियेवर फलाईंग स्कॉड, स्टॅटीक सर्व्हलन्स टीम, व्हीडीओ सर्व्हलन्स टीम आदी एकुण २८ पथकांची करडी नजर असणार आहे. निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून दि. १९ एप्रिलपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार आहेत. दि. २० एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार आहे.

दि. २२ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार आहेत. दि. ७ मे रोजी मतदान होणार असून दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी वर्षा ठाकुर-घूगे यांनी सांगीतले.

लातूर लोकसभेच्या निवडणुकीत महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, ७५ टक्क्यांपर्यंत मतदान व्हावे त्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबरोबरच विविध सण, उत्सव, जयंत्यांमध्येही जनजागृती करण्यात आली आहे. वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न आहे.

(पान ७ वर)

# भाजपने ईडीचे प्रयोग थांबविले पाहिजे

मुंबई : शिवसेना शिंदे गटाचे उत्तर पश्चिम लोकसभेचे विद्यमान खासदार गजानन किर्तीकर यांनी मुलगा अमोल किर्तीकर यांना ईडीकडून त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे. गजानन किर्तीकर आज (११ एप्रिल) पत्रकार परिषदेत बोलत होते. देशात भाजपाला जनतेचा भक्कम पाठिंबा असताना ईडीचे प्रयोग थांबवले गेले पाहिजे, ईडीमुळे लोकांमध्ये चीड निर्माण होत आहे. ईडीचे प्रयोग करण्याची गरज नाही, असे खासदार गजानन किर्तीकर म्हणाले आहेत.



शिवसेना-भाजपाच्या युतीमधून मी खासदार झालो, याची मला जाणीव आहे. त्यामुळे युतीधर्म मी पाळलेला आहे. मी १० वर्ष खासदार असताना फार महत्वाचे स्थित्यंतर दिल्लीत पाहायला मिळाली. ३७० कलम, जीएसटी, तिहेरी तलाक, राम मंदिर, अशा अनेक प्रश्नावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काम केले. ते काम मी जवळून पाहिले. या सर्व गोष्टीमुळे आमची इच्छा आहे की, नरेंद्र मोदी यांनी पाच नाही तर १० वर्ष पंतप्रधान पदावर राहावे. देशातील जनता पूर्णपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठिशी राहील. मात्र, ४०० पारचा जो नारा लावला, त्यामध्ये कुठेतरी दर्प येता कामा नये असे गजानन किर्तीकर म्हणाले.

ईडीचे प्रयोग करण्याची गरज नाही

महायुतीमध्ये शिवसेना आहे. शिवसेनेची मोठी व्होट बँक आहे. याचा फायदा महायुतीमधील उमेदवाराला होत असतो. त्यामुळे आता ईडीचे प्रयोग करण्याची गरज नाही. येवढा भक्कम पांठिबा देशामधून भाजपाला आहे. ईडीमुळे जनतेमध्ये फार मोठ्या प्रमाणात चीड निर्माण झाली आहे. लोक ईडीच्या कारवाईला कंटाळले आहेत. त्यामुळे ईडीचे प्रयोग थांबवले गेले पाहिजेत असे गजानन किर्तीकर म्हणाले.

# रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपीला कोलकात्यातून अटक

नवी दिल्ली : बंगळुरूच्या रामेश्वरम कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेला (एनआयए) शुक्रवारी मोठे यश मिळाले आहे. एनआयएने या कटाच्या सूत्रधारासह दोन आरोपींना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुसावीर हुसैन शाजिब आणि अदबुल मतीन अहमद ताहा यांना कोलकाताजवळ अटक करण्यात आली आहे. एनआयएला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे याा प्रकरणाशी संबंधित अधिका-यांनी सांगितले की, शाजिब हाच व्यक्ती होता ज्याने कॅफेमध्ये इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाईस (आयईडी) ठेवले होते.

(पान ७ वर)

# दोन जागांवरून काँग्रेस आणि ठाकरेंमध्ये वाद

मुंबई : लोकसभा मतदारसंघाच्या जागावाटपावरुन काँग्रेस आणि ठाकरे गटातला वाद काही संपताना दिसत नाही. मुंबईच्या जागावाटपात विश्वासात घेतले नाही असा आरोप करत वर्षा गायकवाडांनी स्वपक्षावरच नाराजी बोलून दाखवली.



राज्यातल्या काँग्रेस नेत्यांनी मुंबईतल्या जागांसाठी फारसा आग्रह धरला नसल्याचा आरोपही वर्षा गायकवाडांनी केला. वर्षा गायकवाड यांनी मुंबईतल्या जागावाटपाबाबतची तक्रार दिल्लीत हायकमांडकडेही केली. दुसरीकडे सांगलीवरुनही ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये कुस्ती रंगली. सांगलीत उद्धव ठाकरेंनी परस्पर उमेदवार जाहीर केला. शिवसेनेची कोल्हापूरची जागा शाहू महाराजांमुळे काँग्रेसकडे गेली. तेव्हा पश्रि्चम महाराष्ट्रात एकतरी जागा असावी म्हणून सांगलीची जागा मागितल्याचा दावा ठाकरे गटाने केला. सांगली हा स्वातंत्र्यापासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला. तेव्हा जिल्ह्यात शिवसेनेची ताकद नसताना दुसरीकडे काँग्रेसची ताकद आणि संघटनाही असताना सांगलीची जागा ठाकरे गटाला का असा सवाल काँग्रेस नेते करत आहेत.

दुसरीकडे मविआतल्याच एका नेत्याने उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला फूस लावल्याचा संशय काँग्रेस नेत्यांना आहे. या नेत्याला सांगलीत काँग्रेसचं वर्चस्व नको असल्याचा आरोपही सांगली जिल्ह्यातले नेते खासगीत करत आहेत. काँग्रेसचे इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांचे बंधू प्रतीक पाटील यांनी प्रकाश आंबेडकरांचीही भेट घेतली. त्यामुळे विशाल पाटील आता वंचितच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार का? याचीही चर्चा सुरु झाली. सांगलीत ठाकरे गटाने आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिली. दुसरीकडे सांगलीचे स्थानिक काँग्रेस नेते मात्र ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात उभे ठाकले आहेत. मविआतल्या नाराजीनाट्यामुळे सांगलीमध्ये महाविकास आघाडीचे गणित बिघडण्याची चिन्हे दिसत आहेत.

(पान ७ वर)

# काँग्रेस पक्ष डायनासोर प्रमाणे लुप्त होणार

डेहराडून : लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान एका सभेला संबोधित करताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काँग्रेस पक्षावर घणाघात केला. उत्तराखंड येथील गढवाल लोकसभा मतदारसंघात भाजप उमेदवार अनिल बलूनी यांच्या समर्थनार्थ एका जाहीर सभेचे आयोजन करण्यात आलं होतं. २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या काही वर्षांनंतर लहान मुलंसुद्धा काँग्रेस पक्षाला ओळखणार नाहीत असे म्हणत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काँग्रेस पक्षावर हल्लाबोल केला आहे.



लोकसभा निवडणूका तोंडावर आल्या आहेत. अशातच मागील काही दिवसांपासून अनेक दिग्गज नेत्यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिलेली आहे. पक्ष सोडून गेलेले नेते एनडीएमध्ये सहभागी होत आहेत. या नेत्यांमध्ये मिलिंद देवरा, अशोक चव्हाण यांच्यासारख्या मोठ्या नेत्यांचा समावेश आहे. अशोक चव्हाण भाजपामध्ये दाखल झाले. त्यानंतर भाजपने त्यांना राज्यसभेवर संधी दिली. तर मिलिंद देवरा हे शिवसेनेमध्ये सहभागी झाले आहेत.

काँग्रेसमधून नेते पळून जात आहेत. एकानंतर एक पक्ष सोडत आहेत. बाहेर पडलेले नेते भाजपा किंवा एनडीएमधील घटकपक्षांमध्ये सहभागी होत आहेत. मला भीती आहे की, (पान ७ वर)

# अवकाळी पावसाचा मुक्काम आता सोमवारपर्यंत

पुणे : राज्यात गेल्या आठवड्याच्या अखेरपासून सुरू झालेली अवकाळी पावसाचा मारा अजूनही सुरू आहे. वादळीवा-यासह झालेल्या गारपिटीमुळे राज्यात मोठे नुकसान झाले असताना हवामान खात्याने अवकाळीचा मुक्काम पुन्हा वाढण्याचा इशारा दिला आहे. येत्या १५ एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचे संकट कायम राहणार आहे. दरम्यान आज शुक्रवारी पूर्व विदर्भात वादळी पाऊस आणि गारपिटीचा इशारा, तर मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.



भारतीय हवामान खात्याने आज शुक्रवारीदेखील महाराष्ट्रात पावसाचा इशारा दिला आहे. येत्या २४ तासांमध्ये विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मूसळधार पावसाची वर्दी दिली आहे. आज विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच बीड, लातूर, धाराशिव, सांगली, परभणी, यवतमाळ, वाशिम, छत्रपती संभाजीनगर व सोलापूरात वादळीवारा आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या जिल्ह्यात पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

तर काही ठिकाणी तूरळक पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे. यादरम्यान राज्यात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा परिसरावर १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वा-यांची स्थिती आहे. तर आग्नेय राजस्थानमधील चक्राकार वा-यांपासून गुजरात, कोकण, कर्नाटक किनारपट्टीपर्यंत हवेचा कमी दाबाचा सक्रिय आहे.

बुधवारी सायंकाळनंतर बीड, अकोला, बुलडाणा, परभणी या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाने हजेरी लावली. तर गुरूवारी नागपूर येथे पावसाच्या सरी कोसळल्या. दरम्यान, विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या बहुतांश भागात आकाश ढगाळ झाले आहे. अवकाळी पावसामुळे विदर्भात कमाल तापमानातील घट कायम आहे. आज, शुक्रवारी विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आला आहे. (पान ७ वर)

# नकली शिवसेना म्हणता ती तुमची डिग्री आहे का

पालघर : विश्वगुरु म्हणता आणि प्रत्येक भाषण उद्धव ठाकरेचा उद्धार केल्याशिवाय यांचं भाषण पूर्ण होत नाही, नकली शिवसेना म्हणता ती तुमची डिग्री आहे का? अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पीएम मोदींवर घणाघाती प्रहार केला. पालघरमध्ये जाहीर सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी पीएम मोदी आणि अमित शाह यांनी केलेल्या टीकेवर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले की, हा भाडखाऊ जनता पक्ष आहे, यांना गाडायचं असेल आत्ताच गाडा, देणार साथ त्याचा करणार घात अशी प्रवृत्ती असल्याचे ठाकरे म्हणाले.



ठाकरे म्हणाले की, इकडे फणा काढून बसतात आणि तिकडे चीनकडे शेपूट घालून फिरतात. तुम्हाला देशात सरकार पाहिजे ना हो की नाही मग तुम्हाला मोदी सरकार पाहिजे की भाजप सरकार पाहिजे पण ते तर जाहिरात करतात. भारत माता माझी माता आहे मोदीजी तुमचे नाव तुमच्या दाराच्या पाठीवर लावा माझ्या देशाच्या पाठीवरती तुम्हाला लावता येणार नाही, तर गोव्याच्या बाहेर लावा नाहीतर गुजरातीत परत गेल्यानंतर तुमच्या दाराच्या बाहेर नाव लावा पण माझ्या देशाच्या सरकारवरती मोदी नाव पुन्हा लावता कामा नये, येता कामा नये. एक माणूस सगळ्यांना गुलाम बनू शकतो? अशी विचारणा त्यांनी केली.

# हरंगुळ :विद्यार्थिनीच्या खून प्रकरणात फास्टट्रॅक कोर्ट लातुरात व्हावे

लातुर प्रतिनिधी - लातूर तालुक्यातील हरंगुळ बु. येथील भाग्यश्री सूर्यकांत सुडे ही विद्यार्थिनी पुणे येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होती. त्या विद्यार्थिनीचा खून करण्यात आला, या खून प्रकरणाचा कसून तपास करावा, आरोपींना कडक शिक्षा होण्यासाठी विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करून हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे, ते फास्टट्रॅक कोर्ट लातूरात होऊन त्या कोर्टातील न्यायाधीशांची नियुक्ती आठ दिवसात करावी, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली.



लातूर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे शुक्रवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी हरंगुळ बु. येथील विद्यार्थिनी भाग्यश्री सूर्यकांत सुडेला न्याय मिळावा म्हणून कॅन्डल मार्च काढण्यात आला त्यावेळी आयोजीत श्रद्धांजली सभेत ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाणे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, भाजपा शहराध्यक्ष देविदास काळे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडीले, डी. एन. शेळके, रामचंद्र तिरुके, स्वाती जाधव, संभाजी रेड्डी, रमेश सूर्यवंशी, गणेश गोमसाळे, सचिन बंडापले, युनूस मोमीन, संजय पाटील खंडापूरकर, व्यंकट पन्हाळे, श्याम बरुरे, बालाजी कैले, श्रीनिवास शेळके, संभाजी रेड्डी आदीसह सर्वपक्षीय पदाधिकारी यलम समाज बांधव, लातूरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार यांनी विद्यार्थिनी भाग्यश्री सूर्यकांत सुडे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र श्रद्धांजली अर्पण केली, तसेच महिला प्रतिनिधींनी यावेळी आमदार अमित देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार यांना विविध मागण्याचे निवेदन दिले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, हरंगुळ बु. येथील विद्यार्थ्यांनी भाग्यश्री सूर्यकांत सुडे यांची क्रूर हत्या झाली. सुडे कुटुंबियांच्या दुःखात मी व आपण सर्वजण सहभागी आहोत, सरकारने या घटनेची नोंद घेतली आहे. सरकार पावले उचलत आहेत, सुडे कुटुंबियांच्या भावना याच आहेत, की हे प्रकरण घडायलाच नको होते. या राज्यात महिला मुली सुरक्षित आहेत का, आपला समाज हा सुरक्षित असला पाहिजे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, अशा घटना यापूर्वी दिल्ली, पुणे, कोपर्डीत घडल्या अशा घटनेतील आरोपीला फाशी देण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारने पारीत करावा. लातूरातून पुण्याला विद्यार्थी शिकायला जातात, ही घटना घडल्यामुळे हरंगुळ बु. येथील अनेक मुलींना पालकांनी परत बोलावले आहे. प्रत्येकाच्या मनात (पान ७ वर)

# जग पुन्हा युद्धाच्या छायेत; इराण पुढच्या ४८ तासांत इस्रायलवर हल्ला करणार



नवी दिल्ली - आधी युक्रेन-रशिया युद्ध, त्यानंतर हमासमुळे गाझापट्टीत सुरू झालेले इस्रायलचे हल्ले त्यामुळे जगभरात अनिश्र्चिततेचे वातावरण तयार झाले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा जगावर युद्धाचे सावट घोंगावत असल्याचे समोर आले आहे. इराण पुढच्या ४८ तासांत इस्रायलवर हल्ला करू शकते, अशी शक्यता वॉल स्ट्रिट जर्नलने व्यक्त केली आहे. इराणमधील नेत्यांच्या सूत्राच्या हवाल्याने वॉल स्ट्रिट जर्नलने दिली आहे.

इराण आणि इस्रायल दरम्यान तणाव निर्माण झाल्यानंतर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एक महत्त्वाची सूचना दिली आहे. भारतीय नागरिकांनी पुढचे आदेश येईपर्यंत इराण किंवा इस्रायलमध्ये प्रवास करू नये, असे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले आहे. तसेच सध्या या दोन देशांत जे भारतीय नागरिक राहत आहेत, त्यांनी तात्काळ तिथल्या भारतीय दूतावासाशी संपर्क साधून स्वतःची नोंदणी करावी, असेही निर्देश दिले आहेत.

इराण आणि इस्रायलचे शत्रूत्व नवे नाही. इस्रायल आणि हमासमध्ये संघर्ष पेटल्यानंतर इराण युद्धात उतरणार, अशी चर्चा होती. मात्र ऑक्टोबर २०२३ पासून इस्रायल आणि हमास यांच्यात सुरु असलेला संघर्ष थांबायचे नाव घेत नाही. वॉल स्ट्रिट जर्नलने दिलेल्या बातमीनुसार, इस्रायलवर थेट हल्ला करण्यासंबंधीच्या राजकीय जोखमीचे मूल्यमापन इराणी राज्यकर्ते करत आहेत.

इराणमधील सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या सल्लागाराने दिलेल्या माहितीनुसार, इस्रायलवर हल्ला चढविण्याची योजना सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासमोर तयार आहे. मात्र त्यातील राजकीय जोखमीचा ते अंदाज घेत आहेत.

सीरीयातील दमास्कस येथे इराणच्या वाणिज्य दूतावासावर काही (पान ७ वर)

दैनिक
यशवंत
शनिवार दि.१३ एप्रिल २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# अवैध पाणी उपसा करणाऱ्या १०७ मोटरी काढल्या; प्रशासनाची कारवाई, पशुधन पाण्याच्या शोधात..!

## तालुक्यातील जलसाठ्यात कमालीची घट, शिल्लक पाणी जून पर्यंत साठवून ठेवण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न



अहमदपूर दि.१२(कारामुंगीकर) अवैध पाणी उपसा करणाऱ्या १०७ मोटरी काढुन प्रशासनाच्या वतिने कारवाई करण्यात आली असुन पशुधन पाण्याच्या शोधात आहे. तालुक्यातील जलसाठ्यात कमालीची घट, झाली असुन शिल्लक पाणी जून पर्यत साठवून ठेवण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जिल्हाधिकारी यांचे आदेश असताना सुद्धा बागायतदार शेतकऱ्यांनी पाण्याचा अवैध उपसा करत असलेल्या ८४ मोटारी महसूल विभागाने काढले असून २३ मोटारी जप्त केल्या आहेत. यावर्षी अहमदपूर तालुक्यातील जलसाठ्यात कमालीची घट झाली असून येणाऱ्या काळात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार की काय यामुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने सर्वच साठवण तलावावरील मोटारी काढण्यासंबंधी सूचना केल्या होत्या मात्र सदर सूचना करूनही अनेक शेतकऱ्यांनी आपले बागायती ऊस व इतर पिके जगवण्यासाठी साठवण तलावातून अवैधरित्या पाणी उपसा सुरूच ठेवला होता. याबाबत प्रशासनाला माहिती मिळताच प्रशासनाने ८४ मोटारी काढल्या असून त्यांना नोटिसा दिल्या आहेत तर वारंवार सूचना देवुनही अवैध उपसा करणाऱ्या २३ मोटारी जप्त केल्या आहेत. त्यातील काळेगाव साठवंन तलाव येथील ५, तांबड सांगवी ६, उगलेवाडी ५, वैरागड ३, या मोटारी वायर सह जप्त करण्यात आल्या असून संबंधित ग्रामपंचायतकडे जमा करण्यात आलेल्या आहेत.

यापूर्वी सूचना दिलेल्या मोघा तलाव वरील १२ थोडगा ५ तांबट सांगवी १६ उगलेवाडी १० नांदुरा १५ कोपरा १२ पाटोदा ७ वैरागड १३ अशा ८४ मोटारी काढून संबंधित शेतक्यांना नोटीसा दिल्या आहेत. मात्र जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत, आपले पिके वाचण्यासाठी शेतकरी अवैधरित्या पाणी उपसा करत आहेत. त्यामुळे पशुधनांचा पाण्याची वाणवाहोत असून जून अखेर पर्यत पाणीसाठा राहिल्यास पशुधनाला पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे अन्यथा जंगली पशुधन पाण्याची दुर्भिक्ष जाणवणार आहे.



# स्वीप पथकाद्वारे सुनेगाव शेंद्री येथे केली मतदार जनजागृती

अहमदपूर दि.१२(कारामुंगीकर) स्वीप पथकाद्वारे सुनेगाव शेंद्री येथे केली मतदार जनजागृती करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ साठी अहमदपूर तालुक्यातील सुनेगाव शेंद्री गावातून ७ मे रोजी १००% मतदान करण्यासाठी विविध लोकगीतातून ११एप्रिल रोजी सकाळी उपस्थितीत मतदार बंधूना मतदान करण्यासाठी स्वीप पथकाने जनजागृती केली.

या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूरचे तहसीलदार शिवाजी पालेपाड व चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे ,जयसिंह जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती कार्यक्रम करण्यात येत आहे. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे सदस्य महादेव खळुरे,शिवकुमार गुळवे,मोहन तेलंगे,नागनाथ स्वामी,बस्वेश्वर थोटे,पुरुषोत्तम काळे,श्रीमती अर्चना माने, तलाठी शिवराज कांबळे,विजय गडेकर, सेवक बालाजी वाघमारे, यांच्या सह गावातील मतदार बंधू भगिनिनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला उपस्थितीत होते.




# बहुजन रयत परिषदेच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन

अहमदपूर दि.१२ (कारामुंगीकर) बहुजन रयत परिषद नांदेड च्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, बहुजन रयत परिषद नांदेड च्या वतीने दिनांक ११ एप्रिल २०२४ रोज गुरुवारी राष्ट्रपिता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी परिसरातील सर्व सन्माननीय नागरिक व पदाधिकाऱ्यांसह बहुजन समाज बांधव सकाळी ८:३० वाजता आय.टी.आय चौकातील पुतळ्याजवळ उपस्थित राहुन कार्यक्रमास सहकार्य केले.

या कार्यक्रमास नांदेड शहराध्यक्ष भारत कलवले , नांदेड शहर सचिव प्रा. सी. एल. कदम तसेच इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.



# आरोग्यदायी बीटचे अनेक फायदे

भाज्यांमध्ये बीट सर्वात फायदेशीर मानली जाते. त्याचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. ते शरीरात हिमोग्लोबिन बनविण्याचे कार्य करतात. बीट रक्त स्वच्छ करण्यास देखील मदत करते. बीटरुटमध्ये भरपूर जीवनसत्त्वे आणि खनिजे आढळतात. याशिवाय लोह, सोडियम, पोटॅशियम, फॉस्फरस इत्यादी घटकांमध्येही समृद्ध आहे. एकीकडे बीट आरोग्यासाठी फायदेशीर आहे तर दुसरीकडे त्वचा सुधारण्यासही फायदेशीर आहे. हे अँटीएजिंग म्हणून कार्य करते. चला तर मग जाणून घेऊया बीटाचे फायदे...

**✻बीटचे फायदे –✻**

डागविरहित त्वचेसाठी – चमकदार आणि गुळगुळीत त्वचेसाठी बीटचा रस खूप फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन-ए, सी आणि व्हिटॅमिन-के असते जे शरीराच लोह, तांबे आणि पोटॅशियमची आवश्यकता पूर्ण करते आणि त्वचा निरोगी ठेवते. बीटचा रस इतर कोणत्याही भाज्या किंवा फळांच्या रसात मिसळला जाऊ शकतो.

**✻चमकदार त्वचेसाठी✻** –

चमकणारी त्वचा मिळविण्यासाठी आपण बीट फेस मास्क वापरू शकत फेस मास्क बनविण्यासाठी, ब्लेंडरमध्ये सोलून बीटचे तुकडे घालून पेस्ट तयार करा एका भांड्यात पेस्ट काढा आणि त्यात एक चमचा मॉइश्चरायझिंग क्रीम मिसळा. ही तयार पेस्ट आपल्या चेहऱ्यावर लावा आणि १५मिनिटे ठेवा. पेस्ट सुकल्यावर चेहरा धुवा. यानंतर आपल्याला आपला स्वतःचा चमकणारा चेहरा दिसेल.

**✻डाग नाहीसे करण्यासाठी✻**

मुरुमांचे चेहऱ्यावर कुरूप डाग पडतात. अशा प्रकारे, बीटचा मास्क चेहऱ्यावरील डाग दूर करण्यासाठी फायदेशीर आहे. बीट मास्क तयार करण्यासाठी, दोन चमचे मुलतानी माती मध्ये ५-६ चमचे बीटचा रस घाला आणि एक पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर आणि गळ्यावर लावा आणि १५ मिनिटे कोरडे होऊ द्या. जेव्हा ते कोरडे होईल तेव्हा त्यावर हातांनी चेहरा आणि गळ्यावर मालिश करा. काही काळ मालिश केल्यानंतर, ते पाण्याने स्वच्छ करा. हे डाग काढून टाकण्यास मदत करेल.

**✻त्वचेचे टोनिंग करण्यासाठी✻**

बीटचे सेवन देखील टोनरसारखे कार्य करते. यासाठी बीटरूटचे तुकडे करा आणि त्यात थोडा कोबी घाला आणि बारीक वाटू घ्या. आइस क्यूब तयार करण्यासाठी हि तयार होणारी पेस्ट आइस ट्रेमध्ये टाका आणि डीप फ्रीजरमध्ये ठेवा. जेव्हा गोठते तेव्हा ते चेहऱ्यावर लावा.

**✻ओठांकरिता✻**

फाटलेल्या ओठांना बरे करण्यासाठी आणि ते मऊ करण्यासाठी बीटरूटचा रस वापरा. बीट रस फ्रिजमध्ये ठेवा, तो दाट झाल्यावर रात्री आपल्या ओठांवर लावा. सकाळी आपण मलईच्या मदतीने ते स्वच्छ करा. ओठांना मऊ आणि गुलाबी बनवण्याचा हा एक नैसर्गिक मार्ग आहे.




**आयुर्वेदाचार्य डॉ. प्रवीण बढे**
सी. एम. डी. प्रिस्टाइन
तथा अध्यक्ष, पंतप्रधान
जनकल्याणकारी जागरूकता
अभियान महाराष्ट्र राज्य
भ्रमणध्वनी ९६६५६२२८८६

# चाकुरचे पहिले नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे यांचा वाढदिवस संपन्न

अहमदपूर दि.१२ (कारामुंगीकर) चाकुरचे पहिले नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे यांचा वाढदिवस संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, फुले, शाहु, आंबेडकरी चळवळीतील बिन्नीचे कार्यकर्ते तथा रिपाईचे जिल्हा सचिव,चाकुर नगरीचे पहिले नगराध्यक्ष ,संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य,आणि सध्या बांधकाम सभापती म्हणून कार्यरत असलेले आमचे मित्र आयु मिलिंदराव महालिंगे यांच्या वाढदिवसानिमित्त होलार समाज संघटनेच्या वतीने साहित्यिक तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त प्रा वैजनाथ सुरनर यांनी सत्कार, अभिष्टचिंतन करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी पत्रकार विकास स्वामी, सुधाकर हेमनर, नितीन रेड्डी,संग्राम वाघमारे, रिपाइंचे तालुका अध्यक्ष पपण कांबळे, रंगनाथ वाघमारे ,सागर होळदांडगे,चेतन महालिंगे,नितीन डांगे,बालाजी मोठेराव,विक्की महालिंगे,इ. कार्यकर्ते उपस्थित होते....या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशिल वाघमारे यांनी केले.




# आपल्याकडे देशाला, समाजाला देण्यासाठी काही वेळ आहे का.?

आपल्याकडे देशाला, समाजाला देण्यासाठी काही वेळ आहे का.?(देशासाठी काही वेळ काढून शेवटपर्यंत नक्की वाचा).. आपण परंपरेनुसार चालत आलेले सणउत्सव साजरे करत असतो,परंतु आपल्याला त्यापाठी मागचा इतिहास खरा उद्देश काय असतो ते माहित आहे का..? आपण त्या दिवसापुरता ते सण साजरे करतो आणि दुसऱ्या दिवशी होते तसे हे योग्य आहे का?हे तर असे झाले सकाळी भारत माझा देश आहे अशी प्रतिज्ञा म्हणायची आणि रात्री बाजूच्या घरात कचरा टाकायचा.खरच आपण जसे सणउत्सवात राहतो मिळून मिसळून तसे वर्षभर का राहत नाही..?

मकर संक्रात आली की आपण म्हणतो तीळ गूळ घ्या गोड गोड बोला आपण जर वर्षभर सर्वांशी प्रेमाने वागलो तर खर त्याचे महत्व. काही लोकांनी तर हा सण ह्या लोकांचा तो त्या लोकांचा असे भेदभाव केल्याचे जाणवते.हा भेदभाव केव्हा संपेल..?दिवाळी दिवे लावून आपण साजरी करतो पण जे लोक अनाथ आहेत,गरीब आहेत त्यांचा घराला आधार देऊन,प्रेमाचे दोन शब्द बोलुन त्यांचे जीवन दिव्याच्या प्रकाशाप्रमाणे उजलावे,हे आपणास केव्हा कळेल?कुठपर्यंत एकमेकांबद्दल मनामध्ये द्वेष,राग ठेवणार अरे शेवटी जाताना काय घेवून जाणार आहेत सोबत,त्यात हे जीवन क्षणभंगुर.?मग माणूस आयुष्भर कष्यचा गर्व करतो.

आपले सैनिक,पोलीस व इतर कर्मचारी तिकडे कोणताही ऋतू असुदे कितीही वारा पाऊस असुदे आपल्या देश्याची सेवा करतात.विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय सेवेमध्ये येऊन समाजकार्य करण्यासाठी घरापासून लांब राहून शिकतात. त्या सर्वांना वाटत नसतील का सण साजरे करावे आणि आपण काय करतो गावागावामध्ये, गल्लिगली मध्ये माणसामाणसात भेदभाव,द्वेष.आपण पूर्ण गावात एक सार्वजनिक होळी,गणेशोत्सव साजरी करतो का.?आपण एकत्र सणउत्सव केले तर लोक एकत्र येतील व प्रदूषण कमी होण्यास हातभार लाभेल.

दसऱ्याला रावणचे दहन करतो परंतु स्वतः मधील असणाऱ्या अहंकाराचे आपण केव्हा दहन करणार?होळीच्या निमित्त नकारात्मक गुण किंवा वाईट सवयींचे दहन आपण करतो का?आपल्या देशांमधून गणपती विसर्जन प्रमाणे असत्याचे,भ्रष्टाचाराचे, अन्यायाचे केव्हा विसर्जन होणार.आपण शिवजयंती साजरी करतो पण छ.महाराजांचे विचार अंगी बाळगतो का? आपण दरवर्षी डॉ. आंबेडकर जयंती साजरी करतो परंतु त्या महामानवांचे विचार अंगी बाळगतो का?हे आता कुठेतरी विचार करायला हवे आणि ती आता काळाची गरज आहे नाहीतर खऱ्या सणाचे उद्देश बाजूलाच राहतील आजकाल तर लोकांना सणउत्सवाच्या शुभेच्छा पण दययला वेळ नाही. आपली राष्ट्रीय सणांची देशभक्ती फक्त २६ जानेवारी,१५ ऑगस्ट व भारतपाकिस्तान मॅच पुरतीच मर्यादित असते.हीच राष्ट्रभक्ती रोज का रहात नाही.वेळेत टॅक्स भरणे,कचरा कुंडीत टाकणे ही राष्ट्रीय सणांची शिकवण आपण का विसरतो.आपल्यामुळे कोणालाही त्रास नको असे जरी वागलो तर ह्या देशात शांतता का नाही टिकणार?आपले सण आपली संस्कृती,इतिहास,वारसा जपायला हवी.स्वतःपासून सुरवात करा मीच का या पेक्षा मी का नाही हा प्रश्न विचारत चला सवतःला. नाहीतर येणाऱ्या पिढीला आपण काय सांगणार आहोत..?



**भारत सुर्यकांत केंद्रे**
रा. उमरगा रेतु, ता. जळकोट
जि.लातूर
७२१८१६०५७५

# गुढी पाडवा मतदान वाढवा मतदार जनजागृतीसाठी तहसीलमध्ये उभारली गुढी



अहमदपूर दि.१२(कारामुंगीकर) अहमदपूर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात मराठी नववर्षानिमित्य लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,तहसीलदार शिवाजी पालेपाड यांच्या हस्ते मगुढी पाढवा मतदान वाढवाफ हे ब्रिद घेऊन मतदान जनजागृतीसाठी गुढी उभारण्यात आली.

स्वीप जनजागृती मोहीम अंतर्गत गुढीपाडवा या सणाच्या निमित्ताने मतदान वाढवा,असे संबोधित चिन्हाचा वापर करून भव्य गुढी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अहमदपूर विधानसभा मतदारसंघात लोकसभेसाठी मतदनाची टक्केवारी वाढविण्यासाठी सदर कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार मुनवर मुजावर,तुकाराम बनकर, अव्वल कारकुन दत्तात्रय मद्दे,दत्तात्रय निलावार, प्रविण कांबळे,ओम उस्तुरे,वहीद्दोदिन शेख ,धनाजी गुंडेवाड,शिपाई आयुब पठाण,इसामोद्दीन शेख,सिद्धार्थ कांबळे आदिंची उपस्थितीत होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वीप मतदान जनजागृती अभियानाचे सदस्य राज्यपुरस्कार प्राप्त कलाध्यापक महादेव खळुरे, बसवेश्वर थोटे, मोहन तेलंगे, शिवकुमार गुळवे, नागनाथ स्वामी, पुरुषोलम काळे, प्रमोद हुडगे, धनंजय नाकाडे आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# कबीरवाणी

**झूठे सुख को सुख कहे,**
**मानत है मन मोद।**
**खलक चबैना काल का,**
**कुछ मुंह में कुछ गोद।**

**भावार्थ** : संत कबीर सांगतात की, अरे जिवा तू खोट्या सुखाला मानुन खुप प्रसन्न होतोस. तुला जे मिळालेले खोटे सुख आहे ते सुख खरे नाही ते क्षणिक आहे. या खोट्या सुखाचा तुला आभास होतो आणि तूचे मन खुश होते. ही संपुर्ण सृष्टी मृत्युसाठी त्या भोजनासारखी आहे जसे भोजनाचा काही भाग तोंडामध्ये आहे आणि काही भोजन त्याच्या ओटीमध्ये आहे. कधीना कधी ते ओटीतील भोजन ही सृष्टी खावून टाकणार आहे. याचाच अर्थ असा की खोट्या सुखाला सुख मानुन या सृष्टीवरील जीव मन प्रसन्न करत आहेत मात्र सृष्टी एके दिवशी सर्वांना संपविणार आहे.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. १३ एप्रिल २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## खा. राजेनिंबाळकर यांनी ईदच्या दिल्या शुभेच्छा

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – रमजान ईदनिमित्त खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी धाराशिव शहरातील मुस्लीम समाज बांधव सार्वजनिक नमाज पठनासाठी ईदगाह मैदानात आलेल्या मुस्लिम बांधवांना खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थिती राहुन शुभेच्छा दिल्या.

तसेच शहरातील इतर जेष्ठ मुस्लीम बांधवांची भेट घेवून शुभेच्छा दिल्या. यावेळी आ कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष नंदुभैय्या राजेनिंबाळकर, रवी कोरे, आबेद सय्यद, सय्यद आलेद साहेब, खलील सय्यद, मोहीब शेख, शहबाज पठाण, रिजवान शेख, अहमद कुरेशी, गफार शेख, शबनम बाजी, अझर पठाण, अतीक उल्लाह हुसैनी, मुजीब काझी, साबेर सय्यद, कलीम कुरेशी, छोटा साजीद, अफरोज फिरजादे, सद्दाम काझी आदींसह



धाराशिव शहरातील शेकडो मुस्लीम बांधव उपस्थित होते.

# निवडणूक खर्च निरीक्षक प्रदीप डुंगडुंग यांनी घेतला आढावा

## विविध कक्षांना भेट देऊन घेतली कामकाजाची माहिती

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाने ४० – उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक श्री.प्रदीप डुमडुम यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक खर्चाचा आढावा घेऊन निवडणुकीच्या कामासाठी गठीत विविध कक्षांना भेटी देऊन तेथील कामकाजाची दि.१२ एप्रिल रोजी पाहणी केली व माहिती जाणून घेतली.

यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव, खर्च विषयक नोडल अधिकारी सचिन इगे, राज्य उत्पादन शुल्कचे बारगजे, अपर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय पाटील, आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी जाधव, झाडे, खडसेतसेच खर्च विषयक कक्षाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना डुमडूम म्हणाले की, निवडणुकीच्या कामात प्रत्येक नोडल अधिकाऱ्याने आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडाव्यात. कोणतीही तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. निवडणुकीतील खर्चविषयक बाबींकडे बारकाईने लक्ष द्यावे. उमेदवाराचा जो प्रत्यक्षपणे खर्च होतो ती माहिती उपलब्ध करून घ्यावी असे त्यांनी सांगितले. तर डॉ.ओंबासे यांनी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाची तसेच विविध नोडल अधिकारी यांच्याकडून करण्यात येत असलेल्या कामाची माहिती दिली. तसेच इगे यांनी सादरीकरणातून उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाची विस्तृत माहिती डुंगडुंग यांना दिली.

आढावा बैठकीनंतर डुंगडुग यांनी जिल्हाधिकारी कार्यालय व नियोजन समिती इमारतीत असलेल्या विविध कक्षांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी सी–व्हीजील ॲप कक्ष, विविध परवाने व चौकशी कक्ष (एक खिडकी), नामनिर्देशन कक्षाला भेट देऊन तेथे स्थापन करण्यात आलेला उमेदवारांचे फोटो, फोटोंचे घोषणा पत्र स्वीकारणे व निदेश पुस्तिका खर्चाचे पुस्तक उपलब्ध करून देण्याबाबतचा कक्ष, नामनिर्देशन तपासणी कक्ष, नामनिर्देशक दैनंदिन अहवाल कक्ष, अनामत रक्कम जमा करणे कक्ष, मतदार यादी कक्ष व कोरे नामनिर्देशन अर्ज तसेच शपथपत्र व इतर नमुने उपलब्धता कक्षाला भेट दिली व उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामकाजाची माहिती जाणून घेतली. तर नियोजन समिती इमारतीत असलेल्या खर्च सनियंत्रण कक्ष, तक्रार निवारण व मतदार मदत व नियंत्रण कक्ष तसेच माध्यम प्रमाणीकरण व सानियंत्रण कक्षाला सुद्धा भेट दिली व कामकाजाची माहिती त्यांनी जाणून घेतली व काही उपयुक्त सूचनाही केल्या.




## यशराज पब्लिक स्कूलच्या सहलीची बुध्द गुफा देखाव्यास भेट



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समिती आयोजित कार्यक्रम दि.११ एप्रिलपासून चालु झाले आहेत. बुध्द गुफा देखावा उभारुन महामानवाला एका अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्याचा प्रयत्न केला आहे. हा बुध्द गुफा देखावा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत असून दि.१२ एप्रिल रोजी धाराशिव येथील यशराज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. तर समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात नेत्र, बीपी तपासणीसाठी लहान मुलांपासून ते वयोवृद्ध व्यक्तींनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन डॉ. स्मिताताई शहापुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी यशराज पब्लिक स्कूलच्या संचालिका रेखाताई जेवळीकर, कुसुम वाघमारे, साधना वाघमारे, रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ, दलित मित्र शंकर खुने, युवा समुह मंचचे युसुफ सय्यद, रऊफ शेख, देवानंद एडके, रुधिर गायकवाड आदी उपस्थित होते. आरोग्य शिबिरातील वैद्यकीय अधिकारी डॉ कुरील, डॉ.पडवळ, डॉ.विक्रांत राठोड, स्टाफ नर्स प्रियदर्शनी सरवदे, टिळे व इतरांचे समितीच्यावतीने गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात माजी नगरसेवक सिध्दार्थ बनसोडे, राणा बनसोडे, पृथ्वीराज चिलवंत, धनंजय राऊत, दिपक गंभीरे, सुबोध बनसोडे, अशोक सावंत, समितीचे पदाधिकारी गणेश वाघमारे, अंकुश उबाळे, धनंजय वाघमारे, संजय गजधने, बलभीम कांबळे, प्रविण जगताप, संपतराव शिंदे, बापु कुचेकर, दिपक गंभीरे, महेश लोंढे, विष्णु घरबुडवे, स्वराज जानराव, विशाल घरबुडवे, अनोखी वाघमारे, संबोधी गायकवाड आदी उपस्थितीत होते. तसेच यशराज पब्लिक स्कूलची सहल बुध्द गुफा देखावा पाहण्यासाठी आली असता समितीच्यावतीने शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकांचे स्वागत करुन कार्यक्रमाची माहिती वाघमारे यांनी दिली. समितीच्यावतीने फळे वाटप करण्यात आली.

## आरळी येथील संदीप बचाटे बनला पहिला फौजदार

तुळजापूर दि.१२ (प्रतिनिधी) – तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी विरनाथ बचाटे यांचे सुपुत्र संदीप बचाटे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पीएसआय परीक्षेत उत्तीर्ण होत गावातून पहिला फौजदार होण्याचा मान मिळविला आहे. त्यामुळे त्याची गावातून मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला.

आरळी बुद्रुक येथील संदीप विरनाथ बचाटे यांनी पुण्यात राहून स्पर्धा परीक्षेची सातत्यपूर्ण तयारी केली. ५ वर्षांच्या तयारी नंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पीएसआय परीक्षेत यश प्राप्त केले आहे. निकालानंतर गावात आगमन होताच डॉल्बीच्या ठेक्यावर आणि फटाक्यांची आतषबाजीसह मित्र परिवार, गामस्थ आणि आप्तेष्टांकडून स्वागत सत्कार व कौतुक करण्यात आले. वडील विरनाथ, आई जगदेवी व बंधू नागनाथ यांनी संदिपच्या शैक्षणिक प्रवासात खूप कष्ट घेत सकारात्मक साथ दिली. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत भविष्य अजमावण्यासाठी कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या युगात अभ्यास करत असताना अनेक चढ उतार येतात. त्यामुळे पालकांच्या कष्टाची जाणीव मनी ठेवत यशाला गवसणी घालावी लागते असे मत संदीप बचाटेने सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त समता पंधरवड्याचे आयोजन - सोनवणे

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातर्फे समता पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१० ते २५ एप्रिल या कालावधीत समता पंधरवडा असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.



समता पंधरवड्यात ११ वी, १२ वी विज्ञान शाखेतील व व्यावसायिक अभ्यासक्रम २०२३–२४ मधील सर्व प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रकरणे तालुका व महाविद्यालय निहाय संख्यात्मक माहिती समानसंधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय व जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहे. तसेच समता पंधरवडयात सीईटी देणारे विद्यार्थी, डिप्लोमा तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज देखील भरण्यात येऊन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयातील समानसंधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. तर समान संधी केंद्राच्या माध्यमातून सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करण्यात येणार असून प्राप्त अर्जावर तत्काळ कार्यवाही करून वैधता प्रमाणपत्र देण्याचे नियोजन जात पडताळणी समितीच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयात परिपूर्ण अर्ज सादर करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

## मसापच्या गझल सादरीकरणामुळे रसिक मंत्रमुग्ध

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – प्रेम, भक्ती, राजकारण, स्त्री विषयक जाणिवा, निसर्ग, शेती व शेतकरी अशा विविध विषयांवरील भावगर्भ आशयांच्या गझलांनी धाराशिवकरांची मने जिंकली. मराठी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या धाराशिव शाखेच्यावतीने आयोजित करण्यात आलेला गझल पाडवा चांगलाच रंगला. दोन तासांहून अधिक वेळ रसिकश्रोत्यांनी मंत्रमुग्ध होवून दर्जेदार गझलांचा आनंद घेतला. प्रारंभी गझलसम्राट सुरेश भट यांच्या स्मृतींना वंदन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. जिल्ह्यात साहित्य चळवळ अधिक प्रभावीपणे पुढे घेवून जाण्यासाठी अशा कार्यक्रमांच्या आयोजनासाठी मसाप सातत्याने प्रयत्नशील असल्याचे मसापचे अध्यक्ष नितीन तावडे यांनी नमुद केले. यावेळी ज्येष्ठ गझलकार राजेंद्र अत्रे, योगीराज माने यांच्यासह युवराज नळे, भागवत घेवारे, अनिल ढगे, युसुफ सय्यद, गणेश मगर, कृष्णा साळुंके, श्रीपती जमाले, मधुकर हुजरे, विजयकुमार बारसकर, स्नेहलता झरकर, मनीषा पोतदार, विद्या देशमुख, अनिता पडवळ, सारीका देशमुख आणि रेखा ढगे आदी गझलकारांनी दर्जेदार गझलांचे सादरीकरण करीत उपस्थित रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळविली.

मुशायर्याच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द गझलकार बाळ पाटील तर समन्वयक म्हणून मनीषा पोतदार व भागवत पोतदार यांनी जबाबदारी पार पाडली.



या कार्यक्रमाचे नियोजन मसापचे कोषाध्यक्ष माधव इंगळे यांनी तर प्रास्ताविक नितीन तावडे व निवेदन शाम नवले तर आभार डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी मानले.

# आमदार विक्रम काळे बंड करण्याच्या तयारीत ?

## महायुतीच्या उमेदवाराचे वाढविणार टेन्शन

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात केली आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे मराठवाडा शिक्षक पदवीधर मतदार संघाचे विद्यमान आमदार विक्रम काळे यांनी निवडणूक लढविण्यासाठी ४ अर्ज घेतले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महायुतीमधील महत्त्वाचा घटक पक्ष आहे. महायुतीकडून भाजपमध्ये असलेल्या व पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांना उमेदवारी जाहीर केले आहे. या दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर करण्यापूर्वी आमदार विक्रम काळे यांना देखील उमेदवारी देण्यावर जवळपास निश्चित झाले होते. मात्र ऐनवेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेल्या व भाजपमध्ये गेलेल्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांना मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश दिला. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकृत त्यांना उमेदवारी दिली. यापूर्वी ही जागा महायुतीच्या वाटपामध्ये शिवसेनेला सोडावी यासाठी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांचे पुतणे व माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष धनंजय सावंत यांना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्सीखेच केली गेली. मात्र ही जागा राष्ट्रवादीला सुटल्याने तसेच अर्चनाताई पाटील यांना उमेदवारी दिल्यामुळे सावंत गटांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. त्यामुळे धनंजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री शिंदे यांची मुंबई येथे बैठक



घेतली. महायुतीमध्ये सावंत यांचे बंड अद्यापहीत शमले नसतानाच महायुतीमधील मुख्य घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार विक्रम काळे यांनी या लोकसभेसाठी निवडणूक लढविण्यासाठी पहिल्याच दिवशी म्हणजे दि.१२ एप्रिल रोजी चक्क ४ उमेदवारी अर्ज आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून घेतले आहेत. आमदार काळे यांचे या मतदार संघात मोठे नेटवर्क असून दांडगा जनसंपर्क आहे. त्याचा फटका महायुतीच्या उमेदवाराला बसण्याची दाट शक्यता असल्यामुळे विक्रम काळे हे निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## उस्मानाबाद जिल्ह्यातून १६, बार्शी १ व औसा १८ उमेदवारांनी घेतले ३६ अर्ज



### पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र नाही

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी दि.१२ एप्रिल रोजी निवडणूक अधिसूचना जारी झाली आहे.आजपासून नामनिर्देशपत्र भरण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नाहीत. परंतू १८ व्यक्तींनी ३६ नामनिर्देशन पत्राची उचल केली. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी दि.१२ एप्रिल रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. दि.१९ एप्रिल ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. दि.२० एप्रिल रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. दि.२२ एप्रिल ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. दि.७ मे रोजी मतदान होणार आहे. तर दि.४ जून रोजी मतमोजणी होवून निकाल जाहीर होणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत लागू राहणार आहे.

इतर उमेदवारांमध्ये आर्यनराजे शिंदे (२), अर्जुन सलगर शिरगापूर (३), मारुती बनसोडे (१), दत्ता तुपे (१), समीरसिंह साळवी (२), इस्माईल पठाण (१), प्रवीण कांबळे (३), आर्यनराजे शिंदे (२), नवनाथ दुधाळ (४), रहीमोद्दीन काझी (१), गोपाळ दंडगुले (१), सिराजोद्दीन सय्यद (१), जावेद पटेल (२), नवनाथ उपळेकर (२), विश्वजीत शिंदे (४), विलास घाडगे (१), काकासाहेब राठोड (२), गोपाळ जगताप (१) यांचा समावेश आहे.

## नवोदय विद्यालयात महात्मा फुले जयंती व ईद साजरी




धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य श्री गंगाराम सिंह यांचे द्वारा प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरती विद्यालयातील वरिष्ठ अध्यापक सचिन खोब्रागडे, यश पाटील, हरी जाधव, दिलीप राऊत, डॉ. किशोर चौधरी, रविंद्र अलसेट, सुजाता कराड, सुषमा येलकर आदी उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील सार्थक गिरी या विद्यार्थ्याने महात्मा फुले यांच्या कार्यावरती आपले विचार व्यक्त केले. तर विद्यालयाचे प्राचार्य गंगाराम सिंह यांनी महात्मा फुले यांनी सर्वसामान्य लोकांसाठी व मुलींसाठी शिक्षणाची गंगोत्री घरोघरी कशी पोहोचवली ? हे सांगून केवळ शिक्षणामुळे भारताचे उच्च पद राष्ट्रपती पदापर्यंत महिला पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिक्षण क्षेत्रामधील कौशल्य आत्मसात करून भारत देशाला अग्रेसर करावे असे आवाहन त्यांनी केले. तर रमजान महिना कसा पवित्र असतो ? हे सांगून सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी जाधव यांनी केले.

# संपादकीय

## प्रदूषणाच्या बाबतीत आत्मचिंतनाची गरज

स्वीडनमधील आयक्यू एअर' ही संस्था दरवर्षी जगातील प्रदूषित देश आणि शहरांची यादी जाहीर करत असते. या अहवालातून बोध घेऊन प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजण्याऐवजी या संस्थेला नावे ठेवली जातात. मात्र, बांगलादेश-पाकिस्तानपेक्षा आपल्याकडे कमी प्रदूषण असल्याचा आनंद मानायचा की जगातील प्रदूषित शंभर शहरांमध्ये ८३ व्या क्रमांकावर असल्याबद्दल आत्मचिंतन करायचे, हे आपण ठरवायला हवे. गेल्या काही वर्षांपासूनचे आयक्यू एअर' या संस्थेचे अहवाल पाहिल्यानंतर नाक मुरडण्याचे आणि इथूनच का हवेचा नमुना घेतला, अशी ओरड करण्याचा प्रयत्न होताना दिसतो. भारतात धूर ओकणारी वाहने, शेतीत कचरा जाळण्याचे प्रकार, औष्णिक वीज केंद्रे, कालबाह्य वाहनांचे रस्त्यावरून धावणे, प्रदूषणाच्या बाबतीत पुरेशी जागरूकता नसणे, औद्योगिक प्रकल्पात प्रदूषणावर उपाययोजना करणाऱ्या यंत्रणांचा अभाव, उन्हाळ्यात डोंगरांना लागणारी आग, जमीन भाजण्याचे प्रकार यामुळे प्रदूषण वाढत आहे. त्याचबरोबर विकासाच्या नावाखाली पर्यावरणरक्षणाला दुय्यम स्थान देण्याचे प्रमाण वाढले आहे. एका अभ्यास अहवालानुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित राजधानी म्हणून नवी दिल्लीवर पुन्हा शिक्कामोर्तब झाले आहे; तर औद्योगिकीकरण -विकासापासून दूर असलेला बांगलादेश जगातील सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे फारसे विकसित नसलेले बिहारमधील बेगुसराय हे शहर जगात सर्वाधिक प्रदूषित महानगर होते आणि मेघालयातील एका शहराचा या यादीत समावेश होतो, हे आपल्या विकासाच्या संकल्पनेचा एकूणच पुनर्विचार करायला लावणारे आहे.

जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी नऊ, पन्नासपैकी ४२ आणि शंभरपैकी ८३ एकट्या भारतात आहेत. स्वीडनमधील हवेच्या गुणवत्तामापनाच्या तंत्रज्ञानात आघाडीवर असलेली आयक्यू एअर' संस्था गेली सलग सात वर्षे साऱ्या जगातील हवा प्रदूषणाची विविध माध्यमातून माहिती संकलित करून अहवाल सादर करते. भारताला जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून अभिमान वाटतो; परंतु त्याचबरोबर जगातील सर्वात प्रदूषित शहरे असलेला देश म्हणून आपली प्रतिमा जगभर खराब होते. त्याची चिंता आपल्याला नाही.

आयक्यू एअर'ने हवेच्या जागतिक गुणवत्तेवर जारी केलेल्या अहवालानुसार, बांगलादेश आणि पाकिस्ताननंतर भारत जगातील तिसरा सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. हे रँकिंग हवेतील २.५ मायक्रॉन किंवा त्यापेक्षा कमी कणांच्या घनतेवर (पीएम २.५) आधारित आहे. २०२३ मध्ये भारताची वार्षिक पीएम २.५ घनता ५४.४ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होती. त्याच वेळी ती बांगलादेशमधील ७९.९ मिलीग्राम प्रति घनमीटर आणि पाकिस्तानच्या ७३.७ मिलीग्राम प्रति घनमीटरपेक्षा कमी आहे. भारताच्या क्रमवारीबाबत आश्चर्याची बाब म्हणजे ते २०२२ मधील आठव्या स्थानावरून २०२३ मध्ये तिसऱ्या स्थानावर आले आहे. येथे हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, इतर दोन देशांप्रमाणेच भारताची पीएम २.५ घनता २०२१ पासून कमी झाली आहे. त्या वेळी ते ५८.१ मिलीग्रॅम प्रति घनमीटर होते. असे असूनही, जगातील ५० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ४२ शहरे भारतात आहेत.

नवी दिल्ली सलग दुसऱ्या वर्षी जगातील सर्वात प्रदूषित राजधानी म्हणून उदयास आली आहे आणि २०२२ पासून तिची कामगिरी सतत खराब होत आहे. भारतातील शहरी भागात राहणाऱ्या आणि श्वासोच्छ्वासाच्या त्रासामुळे दररोज डॉक्टरांकडे जाणाऱ्या किंवा शहरांच्या प्रदूषित वातावरणात सतत राहणाऱ्यांसाठी ही आकडेवारी अजिबात धक्कादायक नाही. आयक्यू एअर'च्या अहवालानुसार जागतिक आरोग्य संघटनेच्या ५ मिलीग्राम प्रति घनमीटरच्या मार्गदर्शक तत्त्वापेक्षा कमी असलेल्या भागात १.३६ अब्ज भारतीय राहतात.

या यादीत बिहारचे बेगुसराय अव्वल स्थानावर आहे. २०२२ मध्ये हे शहर या यादीत समाविष्ट केले गेले नव्हते; परंतु येथे वार्षिक सरासरी पीएम २.५ घनता प्रति घनमीटर ११८ पेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. गुवाहाटीमध्ये ही घनता २०२२ च्या पातळीपेक्षा दुप्पट झाली आहे. जीवाश्म इंधन जाळणे हा पीएम २.५ चा प्रमुख स्त्रोत असल्याने, देशातील खराब हवेची गुणवत्तादेखील दर्शवते की अक्षय ऊर्जेचा अवलंब करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले जात नाहीत. अजूनही देशाच्या एकूण वीज उत्पादनापैकी ७० टक्के वाटा औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचा आहे.नुकत्याच जाहीर झालेल्या रूफटॉप सोलर प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही परिस्थितीत मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे; मात्र त्यासाठी वीज संबंधित धोरणांमध्येही महत्त्वाचे बदल करावे लागतील. यासोबतच वायू प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीचे अव्वल स्थान हे दर्शवते की, पिकांचे अवशेष जाळण्याबाबत ठोस धोरणात्मक उपाय शोधण्यात आपण कमी पडत आहोत. २०१८ पासून सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत दिल्लीचे नाव चार वेळा आले आहे. जागतिक हवा गुणवत्ता अहवाल, २०२३'मध्ये १३४ देशांची यादी आहे. सात हजार ८१२ ठिकाणांवरील ३० हजारांहून अधिक हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्रांवरून तपशील गोळा करण्यात आला आहे. भारत २०२२ मध्ये जगातील आठवा सर्वाधिक प्रदूषित देश होता. त्यावेळी देशाचा पीएम २.५'स्तर सरासरी ५३.३ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होता.हवेची सर्वात खराब गुणवत्ता असलेले राजधानीचे शहर म्हणून दिल्लीचे नाव यादीत प्रथम आहे. जागतिक यादीतील पहिल्या ५० सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये ग्रेटर नोएडा (क्र.११), मुझफ्फरनगर (१६), गुरुग्राम (१७), आरा (१८), दादरी (१९), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), नोएडा (२६), मेरठ (२८), गाझियाबाद (३५) आणि रोहतक (४७) या शहरांचा समावेश आहे. आयक्यू एअर'च्या ताज्या अहवालाने देशात प्रदूषणाची समस्या गंभीर असून २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी शाश्वत उपाय शोधणे किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित केले आहे. या संकटाबाबत एक उल्लेखनीय बाब म्हणजे अलीकडच्या काही वर्षांमध्ये ते धोरणकर्त्यांच्या नजरेतून बाहेर पडले आहे. सर्वात असामान्य बाब म्हणजे प्रदूषण हा राजकीय मुद्दा म्हणून कधीच चर्चिला जात नाही.देशात सध्या लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. त्यातील प्रचारात किंवा राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात हा मुद्दा कुणी प्रकर्षाने पुढे आणत नाही किंवा त्यावर चर्चा करत नाही. कोणताही राजकीय पक्ष प्रदूषण कमी करण्याचा विषय आपल्या अजेंड्यावर ठेवत नाही. याची मोठी किंमत अर्थव्यवस्थेला चुकवावी लागली आहे. जागतिक बँकेच्या मते प्रदूषणाशी संबंधित अकाली मृत्यूंमुळे २०१९ मध्ये ३७ अब्ज डॉलरचे आर्थिक नुकसान झाले. या विषयावर तातडीने धोरणात्मक पावले उचलण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे. दरवर्षी साधारणतः ऐंशी लाख किंवा मिनिटाला सोळा जण प्रदूषणाच्या समस्येने आयुष्याला मुकत आहेत, हे दाहक वास्तव आहे.

आयक्यू एअर'ने जारी केलेल्या या आकडेवारीबद्दल त्यांच्या निरीक्षण यंत्रणेबाबत किंवा मर्यादांबाबत मतमतांतरे होऊ शकतात. बिहार तसेच अन्य काही राज्यातील प्रदूषण मंडळाने या अहवालालाच आक्षेप घेतला आहे. या यादीत गुवाहाटीचा समावेश झाल्यानंतर आसामच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने आव्हान दिले. बेगुसराईमध्ये मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. बिहारमधील प्रदूषणाचा अभ्यास करण्यासाठी, निरीक्षण यंत्रणा आणि इतर सामग्री तैनात केलेली आहे. तथापि, त्याची निरीक्षणे जाहीर केली गेलेली नाहीत. कदाचित ती माहिती आणि आयक्यू एअर'ने दावा केलेली माहिती यांची पडताळणी केल्यास अधिक बिनचूक वस्तुस्थिती समोर येईल. दिल्लीतील पीएम २.५ ची (पर्टिक्युलेट मॅटर-अतिसूक्ष्मकण) पातळी १०२ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर नोंदवली आहे. त्यात वर्षागणिक वाढ होत असल्याचे निदर्शनाला येत आहे. हीच पातळी बेगुसराईमध्ये ११८.९ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर आहे. म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेच्या आदर्श पातळीपेक्षा ती चोवीसपट अधिक आहे.आरोग्य संघटनेने पाच मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर ही स्वीकारार्ह पातळी मानली आहे. त्यामुळे आयक्यू एअर'च्या निरीक्षणाबाबत सरकार काय तो निर्णय घेईल; मात्र प्रदूषणामुळे शहरांचा श्वास कोंडला जात आहे. महानगरे गॅस चेंबर' झाली आहेत, हेच वास्तव आहे. प्रदूषणावर मात करण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यासाठी लोकांमध्येही जाणीव-जागृती वाढायला हवी. इतर प्रश्नांप्रमाणेच याही प्रश्नावर जनमताचा रेटा तयार व्हायला हवा.-मिलिंद बेंडाळे, पर्यावरण अभ्यासक

---

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया अपेक्षित आहे.**

**- संपादक यशवंत लातूर**



## एडमंड हॅले ६७

खगोलशास्त्रातील असामान्य असा धूमकेतूचा शोध लावणाऱ्या एडमंड हॅलेचा जन्म एका श्रीमंत घराण्यात ८ नोव्हेंबर १६५६ साली झाला. त्याच्या घराण्यातील दर्जेदार साबणाचा कारखाना त्या वेळी खूपच प्रसिद्ध होता. शालेय शिक्षणानंतर वडिलांनी त्याला ऑक्सफोर्डमधील क्वीन्स कॉलेजमध्ये घातले.

आपल्या हुशारीने तेथे तो चांगलाच चमकला. तरीही साबण कारखान्याचा यशस्वी उद्योगपती बनावे अशी एडमंडच्या वडिलांची खूप इच्छा होती. त्याला मात्र या साबण उद्योगात बिलकुल रस नव्हता. मग वडिलांनी त्याची आवड ओळखून त्याला दोन-तीन दुर्बिणी आणून दिल्या. पुढे ग्रहज्योतिष व गणिताचा अभ्यास सुधारल्यामुळे एडमंडने केवळ विसाव्या वर्षी स्वयंप्रज्ञेने ग्रहाच्या गतीबद्दल एक संशोधन-प्रबंध सादर केला. तेव्हा रॉयल सोसायटीने प्रबंधाचे परीक्षण करून पुरस्कार देण्याची घोषणा केली.

त्यावेळचे राजे चार्लस् व खगोलतज्ज्ञानी जॉन फ्लॅमस्टीड यांच्या मदतीने एडमंडने सेंट हेलेना येथे प्रयोगशाळा उभारली. तेथील बेटावरून दोन वर्षे सतत निरीक्षणे करून त्याने दक्षिण गोलार्धातून दिसणाऱ्या साडेतीनशे ताऱ्यांची नोंद केली. हे महत्त्वाचे कार्य पाहून रॉयल सोसायटीने एडमंड हॅलेला आपले सभासत्व देऊन गौरविले. या वेळी तो फक्त २२ वर्षांचा होता.

त्यानंतर त्याने आपले लक्ष धुमकेतूंच्या अभ्यासाकडे वळवले.राजा चार्लस् याच्या प्रोत्साहनामुळे व द्रव्यसाहाय्यामुळे एडमंडने आपल्या युरोप सफरीमध्ये महिनोन्महिने आकाश निरीक्षणामध्ये खर्च केले. या प्रवासामध्येच १६८२ मध्ये त्याला एका नव्या (आताच्या हॅले) धुमकेतूचे दर्शन झाले. निरीक्षणानंतर एडमंडला असे आढळून आले की या शेंडेनक्षत्राला म्हणजे धुमकेतूला, एक अति तेजस्वी केंद्रस्वरूप असा तारा आहे. त्याचे डोके म्हणजे कोमा बराच मोठा आहे. त्याची शेपटी शेकडो मैल आकाशात पसरलेली आहे. एडमंडने त्याचे नाव 'ग्रेट कॉमेट' असे ठेवले.

शिवाय हा धुमकेतू आताच नव्याने दिसला नसून पूर्वीसुद्धा माणसांच्या पाहण्यात तो अनेक वेळा येऊन गेला असला पाहिजे असा त्याने निष्कर्ष काढला.

साधारणपणे ७५-७६ वर्षांच्या कालावधीनंतर हा धुमकेतू पूर्वीही दिसलेला आहे असे त्याने सांगितले.

ज्या व्यक्तीने एकदा धुमकेतू पाहिला असेल, तो त्या व्यक्तीच्या जीवनात पुन्हा दिसणार नाही, हे जरी खरे असले तरी मनुष्यमात्राला तो पुन्हा केव्हा तरी दिसू शकतो याचे कारण म्हणजे धुमकेतूचा भ्रमणमार्ग हा लंबवर्तुळाकार असतो, अशापद्धतीने खगोलशास्त्रातील असामान्य अशा गणिती व वैज्ञानिक अभ्यासाने एडमंड हॅले यांनी धुमकेतूचा शोधच नव्हे तर एक तत्त्व जगापुढे आणले. म्हणूनच या खगोलशास्त्रज्ञाचेच नाव या धुमकेतूला द्यावे, हे एकमुखाने मान्य केले गेले. म्हणूनच त्या कॉमेटला 'हॅलेचा धुमकेतू' असे नाव पडले व पुढे ते कायम राहिले. अशा या थोर खगोल-तज्ज्ञाचा इ.स. १७४२ मध्ये देहांत झाला.

---

## संपत्तीचे वास्तव, महागाईचा विस्तव

अर्थनगरीतून : महेश देशपांडे, आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

देशातील एक टक्का लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती असल्याचे अलीकडेच एका अहवालातून समोर आले. त्याच वेळी तांबड्या समुद्रातील संकट महागाईला फोडणी देणार असल्याचे विश्लेषकांचे मत पुढे आले आहे. दरम्यान, देशातील सार्वजनिक बँकांचा एनपीए घटल्याने वित्तीय स्थिती मजबूत होण्याची शक्यता वर्तवण्यात आली. आणखी एक लक्षवेधी अर्थवार्ता म्हणजे हिंदुस्तान एरोनॉटिक्स अमेरिकेसाठी विमाने बनवणार आहे. सरत्या आठवड्यात अशा अनेक लक्षवेधी अर्थवार्ता समोर आल्या.



भारतीय लोकांची संपत्ती दिवसेंदिवस वाढत असली, तरी असमानतादेखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत तर गरीब अधिक गरीब होत आहेत. देशातील आर्थिक असमानतेबाबतचा एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यातील माहितीनुसार देशातील फक्त एक टक्का लोकसंख्येकडे ४० टक्के संपत्ती आहे. म्हणजे उरलेल्या ९९ टक्के लोकसंख्येकडे साठ टक्केच संपत्ती आहे. २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. भारतात आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसत आहे. अहवालात दिलेल्या माहितीनुसा २००० पासून देशातील श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढली आहे. २०२२-२३ मध्ये देशातील एक टक्का लोकसंख्येच्या संपत्तीमध्ये २२.६ टक्क्यांची वाढ झाली. थॉमस पिकेट्टी (पॅरिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स), लुकास चॅन्सेल (हार्वर्ड केनेडी स्कूल) आणि नितीनकुमार भारती (न्यूयॉर्क विद्यापीठ) यांनी हा अहवाल तयार केला आहे. देशातील पैसा विशिष्ट लोकांकडेच जात असल्यामुळे दिवसेंदिवस देशातील आर्थिक विषमता वाढत आहे. २०१४-१५ ते २०२२-२३ या काळात देशातील अब्जाधीशांच्या संपत्तीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

त्याचा परिणाम म्हणून देशात गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी वाढली. देशातील फक्त एक टक्का लोकसंख्येकडे सर्वात जास्त हिस्सेदारी आहे. दरम्यान, या अहवालात म्हटले आहे की, देशातील अतिश्रीमंत लोकांवर सुमारे दोन टक्के अतिरिक्त कर लादला जावा. आरोग्य, शिक्षण आणि पोषण यामध्ये गुंतवणूक वाढवली पाहिजे, अशी सूचना या अहवालात देण्यात आली आहे. आर्थिक विषमता अहवालात दिलेल्या माहितीनुसार २००० पासून श्रीमंतांच्या संपत्तीत वेगाने वाढ होत गेली. तिथूनच गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरीमध्ये वाढ झाली. १९९२ मध्ये देशातील एक टक्के श्रीमंत लोकसंख्येकडे १३ टक्के संपत्ती होती; मात्र त्यानंतरच्या काळात २०२२-२३ मध्ये देशातील एक टक्का लोकसंख्येच्या संपत्तीत २२.६ टक्क्यांची वाढ झाल्याची माहिती या अहवालात देण्यात आली आहे. या एक टक्के श्रीमंत लोकसंख्येकडे देशातील ४० टक्के संपत्ती एकवटली आहे. यावरून आर्थिक विषमता किती आहे हे दिसून येते.

दरम्यान, वित्त मंत्रालयाच्या आर्थिक विभागाने फेब्रुवारी २०२४ च्या मासिक आर्थिक आढाव्यात म्हटले आहे की, किरकोळ महागाई सलग सहा महिने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सहनशीलतेच्या बँड'मध्ये राहिली आहे. फेब्रुवारी महिन्यात किरकोळ चलनवाढीचा दर ५.१ टक्के होता. आढाव्यानुसार, किमतीत सातत्याने घट होत असल्याने, मूळ महागाईतही घट दिसून आली आहे; मात्र अर्थ मंत्रालयाने तांबड्या समुद्रात वाढत असलेल्या संकटाला भारतातील महागाई आणि विकासासाठी सर्वात मोठा धोका असल्याचे म्हटले आहे. अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या आर्थिक विभागाने मासिक आर्थिक आढाव्यात सांगितले की, किरकोळ चलनवाढीचा दर गेल्या सहा महिन्यांपासून रिझर्व्ह बँकेच्या दोन ते सहा टक्क्यांच्या सहिष्णुता बँडमध्ये राहिला आहे. आढाव्यानुसार, गैर-अन्न आणि गैर-इंधन म्हणजेच कोअर महागाईमध्ये घट झाली आहे. त्यामुळे महागाई कमी झाली आहे. अहवालानुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षातील एप्रिल ते फेब्रुवारी या काळात सरासरी महागाई दर ५.४ टक्के आहे. तो मागील आर्थिक वर्षाच्या याच कालावधीतील ६.८ टक्क्यांपेक्षा कमी आहे. अर्थ मंत्रालयाच्या या अहवालानुसार, काही खाद्यपदार्थांच्या किमतींमध्ये चढ-उतार होऊनही जुलै आणि ऑगस्ट २०२३ वगळता महागाई दर सहा टक्क्यांच्या खाली राहिला आहे. यंदा अन्न उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा आहे. वित्त मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, २०२३-२४ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, गहू उत्पादनात १.३ टक्के आणि खरीप तांदूळ उत्पादनात ०.९ टक्के वाढ होऊ शकते. तूर डाळीच्या उत्पादनातही गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.९ टक्क्यांची वाढ दिसून येते. त्यामुळे अन्नधान्य महागाई कमी होण्याची अपेक्षा आहे.अर्थ मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, येत्या काही महिन्यांमध्ये महागाईबाबतचा दृष्टिकोन सकारात्मक असणार आहे. मात्र तांबड्या समुद्रामधील संकटाचा जागतिक खाद्यपदार्थांच्या किमतींवर परिणाम झाला आहे. भारताचा युरोपसोबतचा ८० टक्के व्यापार तांबड्या समुद्रातून होतो. त्यात कच्चे तेल, ऑटो ॲन्सिलरीज, रसायने, कापड, पेट्रोलियम स्टील यांचा समावेश होतो. महागड्या मालवाहतुकीचा खर्च, विम्याच्या प्रीमियमची वाढलेली किंमत, लांबलचक ट्रांझिट लाइन यामुळे आयात केलेल्या वस्तू महाग होऊ शकतात. अहवालानुसार, व्यापार खंडित झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याचा धोका असल्याने महागाई वाढण्याची भीती आहे. त्याचा परिणाम विकासावर होऊ शकतो.

आता आणखी एक लक्षवेधी बातमी. देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या एनपीएमध्ये लक्षणीय घट दर्शवली गेली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या ताळेबंदामध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या सहा महिन्यांच्या कामगिरीच्या आधारे हा आकडा समोर आला आहे. या काळातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामगिरीशी तुलना केल्यास खासगी बँकांच्या एनपीएमध्ये मध्ये ६७ टक्के घट झाल्याचे आढळते. एकंदरीत, देशातील बँकांचे एनपीए कमी होत आहे. फिक्की आणि बँक असोसिएशनच्या अहवालात दिसून आले आहे की, सर्वेक्षणामध्ये सहभागी झालेल्या ७७ टक्के बँकांनी एनपीएची पातळी कमी केली आहे. गेल्या सहा महिन्यांच्या आधारे केलेल्या या सर्वेक्षणात खासगी बँकांच्या तुलनेत सरकारी बँकांची कामगिरी चांगली राहिली आहे. खासगी बँकांच्या कामगिरीमध्ये फारसा फरक नाही. या सर्वेक्षणात सार्वजनिक क्षेत्र, खासगी क्षेत्र आणि परदेशी बँकांनी सहभाग घेतला. मालमत्तेच्या आकाराच्या आधारावर पाहिल्यास २३ बँका ७७ टक्के बँकिंग उद्योगाचे प्रतिनिधित्व करतात. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या सर्व बँकांचा विश्वास आहे की, पुढील सहा महिन्यांमध्ये या बँकांची अनुत्पादित मालमत्ता तीन ते साडेतीन टक्क्यांच्या श्रेणीत येईल आणि ही एक उत्साहवर्धक आकडेवारी असेल. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या बँकांपैकी सर्व सरकारी बँकांच्या एनपीएमध्ये घट झाली आहे. खासगी बँकांच्या बाबतीत बोलायचे तर ६७ टक्के बँकांच्या एनपीएमध्ये घट झाली आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये मात्र २२ टक्के खासगी बँकांचा एनपीए वाढला आहे. अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात एनएपीए वाढला आहे.अशीच एक दखलपात्र बातमी म्हणजे संरक्षण क्षेत्रातील दिग्गज कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्सला वेगाने ऑर्डर्स मिळत आहेत. या कंपनीने गयाना संरक्षण दलाशी दोन हिंदुस्थान-२२८ प्रवासी विमानांच्या पुरवठ्यासाठी करार केला आहे. या ऑर्डरची एकूण किंमत सुमारे १९४ कोटी रुपये आहे. गयाना हा दक्षिण अमेरिकेतील एक देश आहे. एक्झिम बँकेकडून गयानाने या विमानासाठी भारताकडून कर्ज घेतले आहे. भारताच्या निर्यात-आयात बँक (एक्झिम बँक)ने गयानाला २३.३ दशलक्ष डॉलर (सुमारे १९४ कोटी रुपये) कर्जाची सुविधा देण्याची घोषणा केली आहे. आपल्या संरक्षण दलासाठी भारताकडून दोन विमाने खरेदी करण्यासाठी गयानाला ही क्रेडिटलाइन देण्यात आली आहे. अलीकडे, इंक्रेड इक्विटीजचे संशोधन विश्लेषक दीपेन वकील यांनी एका अहवालात सांगितले की, हिंदुस्तान एरोनॉटिक्सची ऑर्डर भक्कम आहे; परंतु ऑर्डर पूर्ण करण्याची अंतिम मुदत खूप महत्त्वाची आहे.

---

## राशी भविष्य



१३ २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
लेखी कागदपत्राशिवाय मोठे व्यवहार करणे म्हणजे अंधाऱ्या खाईत उडी घेण्यासारखे होईल. आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा.

वृषभ : शुभ रंग: लाल: शुभ दिशा: उत्तर
नोकरी-व्यवसायासंबंधीचे उच्च ज्ञान किंवा नवे तंत्रज्ञान अत्यंत फायदेशीर ठरेल. महिलांना प्रगतीचा विशेष टप्पा गाठता येईल.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
पैशाची कामे मात्र मनासारखी मिळू शकतील. आपापल्या क्षेत्रात योग्य गुरू भेटतील. दूरचे प्रवास हितकारक ठरतील.

कर्क : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
व्यवसाय-विस्ताराच्या नव्या संधी आकर्षित करतील. भागीदारीचे प्रस्ताव फायदेशीर ठरतील. सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर
आर्थिक ओघ मंद असला तरी त्यात नेमकेपणा मात्र राहील. खर्चाची सोय करता येईल एवढे उत्पनन नक्की चालू राहील.

कन्या : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
वैवाहिक जोडीदाराच्या मदतीने काही आनंदाच्या घटना घडू शकतील. जोडीदाराच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

तुळ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण
आपल्या आवडीच्या गोष्टीसाठी वेळ काढावा लागेल. त्यातून पुरेसा आनंद मिळू शकेल. उत्पन्नाचा नवा मार्ग मिळेल.

वृश्चिक : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पूर्व
एखाद्या जवळच्या मित्राची नाराजी अस्वस्थ करील. मुलांचे वागणे बेचैनी वाढविल. यातूनही मार्ग सापडत राहील.

धनु : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पूर्व
नव्या घराचे स्वप्न बऱ्याच अंशी आकाराला येईल. येणारी आवक बऱ्याच अंशी निर्धोक राहील. आर्थिक व्यवहार फायदेशीर ठरतील.

मकर : शुभ रंग: जांभळा : शुभ दिशा: पूर्व
सासूरवाडीची वेळीच मिळालेली मदत अमूल्य ठरेल. व्यवसाय विस्तार यातून प्सन्न घटना घडतील.

कुंभ : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा. सरकारी कामातील दिरंगाई महागात पडेल. वृद्धांचे आजारपण पळापळ वाढवील.

मीन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
नोकरावर किंवा हाताखालील व्यक्तीवर टाकलेला जास्तीचा विश्वास त्रासदायक ठरेल. हितशत्रूपासून त्रास होणे शक्य.

०९ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर मंगळाचा आणि फक्त मंगळाचाच जास्तीत जास्त प्रभाव आहे. त्यामुळे मंगळ सूचित करीत असलेले सर्व गुण व अवगुण तुमच्या ठायी एकवटलेले आहेत. तुमचे मनोबल व आत्मविश्वास प्रचंड असतो. कुठलेही आव्हान स्वीकारायची तुमची तयारी असते. सत्ता, अधिकार मिळवण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशी तुमची धारणा असते. राजकारणात, समाजकारणात, तंत्रज्ञानात तुम्ही सतत आघाडीवर राहण्याच्या प्रयत्नात असता. मैदानी व मर्दानी खेळांची तुम्हाला आवड असते व त्यावर तुम्ही प्रभुत्वही मिळवता.

आपल्याला पेलेल अशीच आव्हाने स्वीकारा. पैजेच्या नादी लागून प्रतिष्ठेपोटी भलत्या जबाबदाऱ्या अंगावर घेऊ नका. प्रक्षुब्ध मन:स्थितीत वाहन चालवू नका. वेगावर नियंत्रण ठेवा. संताप, शीघ्रकोपीपणा यामुळे डोकेदुखी, मेंदूत रक्तस्त्राव, उच्च रक्तदाब असे विकार उद्भवतील. प्राणायामाने चित्त स्थिर होईल.

कार्यक्षेत्र : यंत्र तंत्र सामग्रीची रचना, जुळणी, दुरूस्ती यामध्ये तुम्हाला रस असतो. त्यामुळे अभियांत्रिकीची पदवी संपादन करणे हा सगळ्यात उत्तम मार्ग. इंधने, वीज, पेट्रोल, ऑटोमोबाईल. या क्षेत्रात तुम्ही आपल्या कौशल्याची चुणूक दाखवू शकाल. तुमचा कल शक्यतो स्वतंत्र व्यवसायाकडे असल्याने आवश्यक तो अनुभव प्राप्त केल्यावर तसाही निर्णय घेता येईल. हृदयरोग चिकित्सक, निष्णात सर्जन, त्वचाविकारतज्ज्ञ म्हणूनही लौकिक मिळेल.

प्रणयी जीवन : प्रेमात उतावीळपणा नको. तुमच्या वृत्ती लवकर फुलून येतात व लवकर शांतही होतात. आपल्या कर्तबगारीचे मनापासून कौतुक करणारा जोडीदार तुम्हाला आवडतो. आपल्या साहसी स्वभावाला त्याने उत्तेजन द्यावे असेही तुम्हाला वाटते. आकर्षण बरेचसे शारीरिक सौंदर्याबल असते. या दृष्टीने सप्टेंबर २३ ते ऑक्टोबर २२ दरम्यानच्या व्यक्ती तुमच्या अपेक्षा पूर्ण करतील.

वर्षफळ : राजकारणात, समाजकारणात आंदोलनाचे नेतृत्व कराल. सत्ता हस्तगत करण्याची आकांक्षा पुरी होऊ शकेल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये गैरसमजामुळे काही माणसे दुरावतील. दूरदृष्टीचा वापर करा. एप्रिल मे मध्ये आर्थिक प्राप्तीचा उच्चांक गाठाल. जून जुलै मध्ये राजकारणात आघाडीवर रहाल. लोकमान्यतेबरोबर राजमान्यता मिळेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये प्रीतीच्या आठवणींना उजाळा मिळेल. विवाह जमतील. नोव्हेंबर मध्ये व्यवसायात विरोधकांच्या कारवाया वाढतील.

महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२.

भाग्यरत्न : पोवळे

याच तारेखेची व्यक्ती :
गणेश वासुदेव जोशी, पंडित कुमार गंधर्व


हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल :** dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com





# अभिनेता सलमान ने ईद च्या मुहूर्तावर केली नव्या सिनेमाची घोषणा



दिग्दर्शक सलमान खानने नव्या सिनेमाचं पोस्टर जारी करत आज त्याच्या चाहत्यांना रमजान ईदच्या शुभेच्छा देखील दिल्या आहेत.ईद आणि सलमान खान हे समिकरण आहे. पण यंदा ईदच्या मुहूर्तावर सलमान खानचा नवा सिनेमा नाही पण पुढील वर्षीच्या ईद साठी त्याने ' सिकंदर' या नव्या सिनेमाची घोषणा केली आहे. २०२५ च्या ईदला हा सिनेमा रसिकांच्या भेटीला येणार आहे. ठ चर्ीीसिरर्वीी या सिनेमाचा दिग्दर्शक आहे. सोशल मीडीयात पोस्टर शेअर करत त्याने ही माहिती दिली आहे.

'सोशली'हे आपल्यासाठी ट्विटर, इन्स्टाग्राम आणि यूट्यूब अशा सोशल मीडिया जगातील ताज्या ब्रेकिंग न्यूज, व्हायरल ट्रेंड व माहिती घेऊन येते. वृत्तात एम्बेड केलेली पोस्ट यूजर्सच्या सोशल मीडिया अकाऊंटमधून थेट एम्बेड करण्यात आली आहे. लेटेस्टलीच्या कर्मचाऱ्याने अथवा लेखकाने त्याचे संपादन किंवा त्यात सुधारणा केलेली नाही. सदर पोस्टमधील वस्तुस्थिती, प्रतिक्रियामधून लेटेस्टलीची मते प्रतिबिंबित होत नाहीत. तसेच या मजकूराची जबाबदारी अथवा उत्तरदायीत्व लेटेस्टली स्वीकारत नाही.)

# म्हैसूर कोर्टाने अजय देवगण स्टारर मैदानाच्या रिलीजवर घातली बंदी




अजय देवगण स्टारर 'मैदान' हा सिनेमा ११ एप्रिलला थिएटरमध्ये रिलीज होण्यासाठी सज्ज होता, मात्र आता एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. म्हैसूर कोर्टाने चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. चित्रपटाच्या निर्मात्यांनी कथा चोरल्याचा आरोप आहे. कर्नाटकातील एका पटकथा लेखकाने न्यायालयात याचिका दाखल केली होती.



अजय देवगण स्टारर 'मैदान' हा सिनेमा ११ एप्रिलला थिएटरमध्ये रिलीज होण्यासाठी सज्ज होता, मात्र आता एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. म्हैसूर कोर्टाने चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. चित्रपटाच्या निर्मात्यांनी कथा चोरल्याचा आरोप आहे. कर्नाटकातील एका पटकथा लेखकाने न्यायालयात याचिका दाखल केली होती. अनिल कुमार यांच्या याचिकेची दखल घेत म्हैसूरच्या प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायालयाने चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती दिली आहे. अमित शर्मा दिग्दर्शित मैदान या चित्रपटात अजय देवगण आणि प्रियामणी मुख्य भूमिकेत आहेत.

हे आपल्यासाठी ट्विटर, इन्स्टाग्राम आणि यूट्यूब अशा सोशल मीडिया जगातील ताज्या ब्रेकिंग न्यूज, व्हायरल ट्रेंड व माहिती घेऊन येते. वृत्तात एम्बेड केलेली पोस्ट यूजर्सच्या सोशल मीडिया अकाऊंटमधून थेट एम्बेड करण्यात आली आहे. लेटेस्टलीच्या कर्मचाऱ्याने अथवा लेखकाने त्याचे संपादन किंवा त्यात सुधारणा केलेली नाही. सदर पोस्टमधील वस्तुस्थिती, प्रतिक्रियामधून लेटेस्टलीची मते प्रतिबिंबित होत नाहीत. तसेच या मजकूराची जबाबदारी अथवा उत्तरदायीत्व लेटेस्टली स्वीकारत नाही.)

# प्रदूषणाच्या बाबतीत आत्मचिंतनाची गरज

मिलिंद बेंडाळे – पर्यावरण अभ्यासक

स्वीडनमधील आयक्यू एअर' ही संस्था दर वर्षी जगातील प्रदूषित देश आणि शहरांची यादी जाहीर करत असते. या अहवालातून बोध घेऊन प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजण्याऐवजी या संस्थेला नावे ठेवली जातात. मात्र, बांगलादेश-पाकिस्तानपेक्षा आपल्याकडे कमी प्रदूषण असल्याचा आनंद मानायचा की जगातील प्रदूषित शंभर शहरांमध्ये ८३ व्या क्रमांकावर असल्याबद्दल आत्मचिंतन करायचे, हे आपण ठरवायला हवे.

गेल्या काही वर्षांपासूनचे आयक्यू एअर' या संस्थेचे अहवाल पाहिल्यानंतर नाक मुरडण्याचे आणि इथूनच का हवेचा नमुना घेतला, अशी ओरड करण्याचा प्रयत्न होताना दिसतो. भारतात धूर ओकणारी वाहने, शेतीत कचरा जाळण्याचे प्रकार, औष्णिक वीज केंद्रे, कालबाह्य वाहनांचे रत्यावरून धावणे, प्रदूषणाच्या बाबतीत पुरेशी जागरूकता नसणे, औद्योगिक प्रकल्पात प्रदूषणावर उपाययोजना करणाऱ्या यंत्रणांचा अभाव, उन्हाळ्यात डोंगरांना लागणारी आग, जमीन भाजण्याचे प्रकार यामुळे प्रदूषण वाढत आहे. त्याचबरोबर विकासाच्या नावाखाली पर्यावरणरक्षणाला दुय्यम स्थान देण्याचे प्रमाण वाढले आहे. एका अभ्यास अहवालानुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित राजधानी म्हणून नवी दिल्लीवर पुन्हा शिक्कामोर्तब झाले आहे; तर औद्योगिकीकरण-विकासापासून दूर असलेला बांगलादेश जगातील सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे फारसे विकसित नसलेले बिहारमधील बेगुसराय हे शहर जगात सर्वाधिक प्रदूषित महानगर होते आणि मेघालयातील एका शहराचा या यादीत समावेश होतो, हे आपल्या विकासाच्या संकल्पनेचा एकूणच पुनर्विचार करायला लावणारे आहे. जगातील दहा सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी नऊ, पन्नासपैकी ४२ आणि शंभरपैकी ८३ एकट्या भारतात आहेत! स्वीडनमधील हवेच्या गुणवत्ता मापनाच्या तंत्रज्ञानात आघाडीवर असलेली आयक्यू एअर' संस्था गेली सलग सात वर्षे साऱ्या जगातील हवा प्रदूषणाची विविध माध्यमातून माहिती संकलित करून अहवाल सादर करते. भारताला जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून अभिमान वाटतो; परंतु त्याचबरोबर जगातील सर्वात प्रदूषित शहरे असलेला देश म्हणून आपली प्रतिमा जगभर खराब होते. त्याची चिंता आपल्याला नाही.

आयक्यू एअर'ने हवेच्या जागतिक गुणवत्तेवर जारी केलेल्या अहवालानुसार, बांगलादेश आणि पाकिस्ताननंतर भारत जगातील तिसरा सर्वात प्रदूषित देश ठरला आहे. हे रँकिंग हवेतील २.५ मायक्रॉन किंवा त्यापेक्षा कमी कणांच्या घनतेवर (पीएम २.५) आधारित आहे. २०२३ मध्ये भारताची वार्षिक पीएम २.५ घनता ५४.४ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होती. त्याच वेळी ती बांगलादेशमधील ७९.९ मिलीग्राम प्रति घनमीटर आणि पाकिस्तानच्या ७३.७ मिलीग्राम प्रति घनमीटरपेक्षा कमी आहे. भारताच्या क्रमवारीबाबत आश्चर्याची बाब म्हणजे ते २०२२ मधील आठव्या स्थानावरून २०२३ मध्ये तिसऱ्या स्थानावर आले आहे.



येथे हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, इतर दोन देशांप्रमाणेच भारताची पीएम २.५ घनता २०२१ पासून कमी झाली आहे. त्या वेळी ते ५८.१ मिलीग्रॅम प्रति घनमीटर होते. असे असूनही, जगातील ५० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ४२ शहरे भारतात आहेत. नवी दिल्ली सलग दुसऱ्या वर्षी जगातील सर्वात प्रदूषित राजधानी म्हणून उदयास आली आहे आणि २०२२ पासून तिची कामगिरी सतत खराब होत आहे. भारतातील शहरी भागात राहणाऱ्या आणि श्वासोच्छ्वासाच्या त्रासामुळे दररोज डॉक्टरांकडे जाणाऱ्या किंवा शहरांच्या प्रदूषित वातावरणात सतत राहणाऱ्यांसाठी ही आकडेवारी अजिबात धक्कादायक नाही. आयक्यू एअर'च्या अहवालानुसार जागतिक आरोग्य संघटनेच्या ५ मिलीग्राम प्रति घनमीटरच्या मार्गदर्शक तत्त्वापेक्षा कमी असलेल्या भागात १.३६ अब्ज भारतीय राहतात.

या यादीत बिहारचे बेगुसराय अव्वल स्थानावर आहे. २०२२ मध्ये हे शहर या यादीत समाविष्ट केले गेले नव्हते; परंतु येथे वार्षिक सरासरी पीएम २.५ घनता प्रति घनमीटर ११८ पेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. गुवाहाटीमध्ये ही घनता २०२२ च्या पातळीपेक्षा दुप्पट झाली आहे. जीवाश्म इंधन जाळणे हा पीएम २.५ चा प्रमुख स्त्रोत असल्याने, देशातील खराब हवेची गुणवत्तादेखील दर्शवते की अक्षय ऊर्जेचा अवलंब करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले जात नाहीत. अजूनही देशाच्या एकूण वीज उत्पादनापैकी ७० टक्के वाटा औष्णिक ऊर्जा प्रकल्पांचा आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या रूफटॉप सोलर प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही परिस्थितीत मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे; मात्र त्यासाठी वीज संबंधित धोरणांमध्येही महत्त्वाचे बदल करावे लागतील. यासोबतच वायू प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीचे अव्वल स्थान हे दर्शवते की, पिकांचे अवशेष जाळण्याबाबत ठोस धोरणात्मक उपाय शोधण्यात आपण कमी पडत आहोत. २०१८ पासून सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत दिल्लीचे नाव चार वेळा आले आहे.

जागतिक हवा गुणवत्ता अहवाल, २०२३'मध्ये १३४ देशांची यादी आहे. सात हजार ८१२ ठिकाणांवरील ३० हजारांहून अधिक हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्रांवरून तपशील गोळा करण्यात आला आहे. भारत २०२२ मध्ये जगातील आठवा सर्वाधिक प्रदूषित देश होता. त्यावेळी देशाचा पीएम २.५'स्तर सरासरी ५३.३ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर होता.

हवेची सर्वात खराब गुणवत्ता असलेले राजधानीचे शहर म्हणून दिल्लीचे नाव यादीत प्रथम आहे. जागतिक यादीतील पहिल्या ५० सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये ग्रेटर नोएडा (क्र.११), मुझफ्फरनगर (१६), गुरुग्राम (१७), आरा (१८), दादरी (१९), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), नोएडा (२६), मेरठ (२८), गाझियाबाद (३५) आणि रोहतक (४७) या शहरांचा समावेश आहे. आयक्यू एअर'च्या ताज्या अहवालाने देशात प्रदूषणाची समस्या गंभीर असून २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी शाश्वत उपाय शोधणे किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित केले आहे. या संकटाबाबत एक उल्लेखनीय बाब म्हणजे अलीकडच्या काही वर्षांमध्ये ते धोरणकर्त्यांच्या नजरेतून बाहेर पडले आहे.

सर्वात असामान्य बाब म्हणजे प्रदूषण हा राजकीय मुद्दा म्हणून कधीच चर्चिला जात नाही. देशात सध्या लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. त्यातील प्रचारात किंवा राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात हा मुद्दा कुणी प्रकर्षाने पुढे आणत नाही किंवा त्यावर चर्चा करत नाही.

कोणताही राजकीय पक्ष प्रदूषण कमी करण्याचा विषय आपल्या अजेंड्यावर ठेवत नाही. याची मोठी किंमत अर्थव्यवस्थेला चुकवावी लागली आहे. जागतिक बँकेच्या मते प्रदूषणाशी संबंधित अकाली मृत्यूंमुळे २०१९ मध्ये ३७ अब्ज डॉलरचे आर्थिक नुकसान झाले. या विषयावर तातडीने धोरणात्मक पावले उचलण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे. दर वर्षी साधारणतः ऐंशी लाख किंवा मिनिटाला सोळाजण प्रदूषणाच्या समस्येने आयुष्याला मुकत आहेत, हे दाहक वास्तव आहे.

आयक्यू एअर'ने जारी केलेल्या या आकडेवारीबद्दल त्यांच्या निरीक्षण यंत्रणेबाबत किंवा मर्यादांबाबत मतमतांतरे होऊ शकतात. बिहार तसेच अन्य काही राज्यातील प्रदूषण मंडळाने या अहवालालाच आक्षेप घेतला आहे. या यादीत गुवाहाटीचा समावेश झाल्यानंतर आसामच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने आव्हान दिले. बेगुसराईमध्ये मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. बिहारमधील प्रदूषणाचा अभ्यास करण्यासाठी, निरीक्षण यंत्रणा आणि इतर सामग्री तैनात केलेली आहे. तथापि, त्याची निरीक्षणे जाहीर केली गेलेली नाहीत. कदाचित ती माहिती आणि आयक्यू एअर'ने दावा केलेली माहिती यांची पडताळणी केल्यास अधिक बिनचूक वस्तुस्थिती समोर येईल. दिल्लीतील पीएम २.५ ची (पर्टिक्युलेट मॅटर-अतिसूक्ष्मकण) पातळी १०२ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर नोंदवली आहे. त्यात वर्षागणिक वाढ होत असल्याचे निदर्शनाला येत आहे. हीच पातळी बेगुसराईमध्ये ११८.९ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर आहे.


म्हणजे जागतिक आरोग्य संघटनेच्या आदर्श पातळीपेक्षा ती चोवीसपट अधिक आहे. आरोग्य संघटनेने पाच मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर ही स्वीकारार्ह पातळी मानली आहे. अर्थात, जीवाश्म इंधन आणि हवेत सोडला जाणारा कार्बन डायऑक्साईड प्रदूषणाचा ६५ टक्के वाटेकरी आहे.

बिहारसारख्या गरीब राज्यात इंधनासाठी स्वयंपाकाच्या गॅसऐवजी केलेला सरपण किंवा तत्सम घटकांचा वापर समस्येत भर घालत आहे. युरोप, अमेरिका आदी सधन देशांमध्ये हवेच्या प्रदूषणाबाबत जागरूकतेची पातळी अधिक आहे. त्यावर नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याबाबत सातत्याने तेथील सरकारांनी पावले उचलली. परिणामी प्रदूषण रोखण्यात यश आले. त्या तुलनेत आशियामध्ये प्रदूषण मोजण्याची यंत्रणाच तोकडी असल्याने माहितीच उपलब्ध नाही, तिथे उपाययोजना काय करणार, हा प्रश्न आहे.

भारतात हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार नाहीत, तोपर्यंत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच राहणार आहे. प्रदूषित हवेतील घातक कण विविध मार्गांनी शरीरात प्रवेश करतात, ते रक्तातही मिसळतात. फुफ्फुस आणि श्वासनलिकेचा दाह आणि त्यासंबंधीचे इतर आजार बळावतात. पार्किन्सनपासून कर्करोगासह विविध आजारांचे मूळ प्रदूषित हवेमध्येच आहे.

त्यामुळे आयक्यू एअर'च्या निरीक्षणाबाबत सरकार काय तो निर्णय घेईल; मात्र प्रदूषणामुळे शहरांचा श्वास कोंडला जात आहे. महानगरे गॅस चेंबर' झाली आहेत, हेच वास्तव आहे. प्रदूषणावर मात करण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यासाठी लोकांमध्येही जाणीव-जागृती वाढायला हवी. इतर प्रश्नांप्रमाणेच याही प्रश्नावर जनमताचा रेटा तयार व्हायला हवा.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# महाराष्ट्राला पुरोगामीत्वाकडे घेऊन जाण्याचे काम महात्मा फुले यांनी केले -प्रा.डॉ.रामकृष्ण बदने



**मुखेड (प्रतिनिधी)** भारत देशात पाच महात्मे झाले. ज्यात महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, महात्मा कबीर,महात्मा गांधी व महात्मा फुले हे होत.आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत ज्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यात फुलेंचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजाला पददलीत जनतेला आणि शुद्रातीशुद्रांना हजारो वर्षाच्या गाढ निद्रेतून जागे करून त्यांना आपल्या न्याय हक्कासाठी जाणीव करून देणारा आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करण्यासाठी आपल्या आयुष्याच्या अखेर पर्यंत अविरत झगडणारा महामानव म्हणजे महात्मा फुले होत.फुलेंनी स्त्री शिक्षणासाठी आपली पत्नी सावित्रीबाईच्या मदतीने मोठे काम केले. अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा काढल्या,विधवा पुनर्विवाह घडवून आणला.बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरच्या पाण्याचा हौद खुला करून दिला. सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेतकऱ्यांसाठी कार्य केले. यासाठी त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहिला. तृतीय रत्न नावाचे नाटक लिहिले. छत्रपती शिवाजी महाराजांवर पोवाडा रचला,ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी,सार्वजनिक सत्यधर्म असे ग्रंथ रचले. त्यांनी लिहिलेले अखंड महत्त्वाचे आहेत. त्यांना असे कार्य करताना तत्कालीन सनातन्यांचा विरोध पत्करावा लागला. यात नवल नाही तर वडिलांनी देखील घरातून बाहेर काढले.तरीही त्यांनी कार्य करणे सोडले नाही. पत्नी सावित्रीबाईना स्वतः शीकवुन शिक्षिका बनविले व मुलींना शिकवावयास लावले. आपत्त्य प्राप्त नसताना दुःखी न होता यशवंत नावाच्या मुलाला दत्तक घेऊन डॉक्टर बनवले. धर्मसंस्थेतील चुकीच्या पद्धतीचा विरोध केला.अज्ञान,अंधश्रद्धेचा विरोध करून महाराष्ट्राला पुरोगामीत्वाकडे घेऊन जाण्याचे काम महात्मा फुले यांनी केले असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.डॉ.रामकृष्ण बदने यांनी ग्रामीण (कला,वाणिज्य व विज्ञान)महाविद्यालय वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड येथील तत्त्वज्ञान विभागाच्या वतीने महात्मा फुले जयंती निमित्त आयोजित महात्मा फुले जीवन व कार्य या विषयावर व्याख्यान प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना केले.

अध्यक्षीय समारोप करतानामहाविद्यालयाचे प्राचार्यडॉ.हरिदासराठोड म्हणाले की तत्त्वज्ञान विभागाने हा स्तुत्य असा कार्यक्रम घेतला.महात्मा फुले हे मोठे बांधकाम व्यवसायीक होते.त्यांनी मुंबई येथे आजही उपलब्ध असलेल्या महानगरपालिका आणि अन्य इमारती बांधल्या. छत्रपती शिवरायांची रायगडावर जाऊन समाधी शोधुन काढली. महात्मा फुलेंना बहुजन समाज उद्धाराची अतिव कळवळ होती. ते महान आत्मा होते म्हणून त्यांना महात्मा म्हटले जाते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ. सखाराम गोरे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.महेंद्र होनवडजकर यांनी मानले.कार्यक्रमास रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.सौ.अरुणा ईटकापल्ले,प्रा.डॉ.निवृत्ती नाईक, ग्रंथपाल डॉ. सुग्रीव क्षीरसागर,प्रा.डॉ. कविता लोहाळे, प्रा. सुनील पवार,प्रा.बालाजी राठोड, सोमनाथ माने तत्वज्ञान विभागातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समताधिष्ठित समाजाची गरज- प्रा. संजय बिबीनवरे




**उदगीर (प्रतिनिधी)** शिक्षणाच्या माध्यमातून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याची गरज आज निर्माण झाली आहे असे मत प्रा.संजय बिबीनवरे यांनी व्यक्त केले. जीवन प्रयाग फाऊंडेशन उदगीरच्या वतीने महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान व स्व.रोहित लाल यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक साहित्य पंडित दीनदयाल उपाध्याय प्राथमिक आश्रम शाळा, उदगीर येथे वाटप करण्यात आले. यामध्ये वही ,पेन, पेन्सिल, खोडरबर ,शॉपनर फुलपट्टी इत्यादी साहित्य देण्यात आले.या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या व्याख्यान व साहित्य वाटप कार्यक्रमात मंचावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक राजेंद्र स्वामी ,प्रमुख पाहुणे माजी पोलीस अधिकारी राजकुमार बिराजदार , प्रमुख वक्ते श्री.प्रा. संजय बिबीनवरे, फाउंडेशनचे सदस्य प्रभात देशपांडे ,कार्यक्रम प्रमुख प्रणव कांबळे ई. उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.संजयबिबीनवरेम्हणाले की,तळागाळातील माणसाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या अर्धांगिनीला सोबत घेऊन केले तसेच समता ,न्याय ,बंधुता निर्माण करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले. असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकनागनाथइटकर व सूत्रसंचालन नितीश शिरसे आणि परिचय प्रणव कांबळे यांनी करून दिले. तर आभार प्रभात सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी कुणाल शिंदे, शिक्षक, शिक्षिका व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार अमित पाशा मोमीन वय १९ वर्ष रा. जळकोट ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे जळकोट ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०२/०१/२००५ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार अमित पाशा मोमीन यांचा जन्म दिनांक. ०२/०१/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार अमित पाशा मोमीन यांचा जन्म दिनांक ०२/०१/२००५ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार अमित पाशा मोमीन यांचा जन्म दिनांक-०२/०१/२००५ रोजीची नोंद नगरपंचायत जळकोट ता. जळकोट येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.
आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २२/०४/२०२४

तालुका दंडाधिकारी तथा
तहसीलदार जळकोट

**झाडे लावा झाडे जगवा**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व हितसंबंधितास विशेषतः प्रॉपर उदगीर गाव, उदगीर तालुका व लातूर जिल्हा येथील या जाहिर प्रगटनाव्दारे सुचित करण्यांत येते की, माझे पक्षकार रंगनाथ पिता मारोती वट्टमवार रा.उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांनी दिलेल्या अधिकार व माहितीवरुन मी पुढीलप्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

हे की, प्रॉपर उदगीर ता.उदगीर येथील सर्वोदय हौसींग सोसायटी, उदगीर येथील प्लॉट नं. २७ ज्याचा नगर परिषद घर कमांक ३-२-२३९, नवीन ३-२-१०५७ ज्याचे क्षेत्र पुर्व पश्चिम ५० फुट, दक्षिण उत्तर ६० फुट एकूण क्षेत्रफळ ३००० चौरस फुट ज्याची चतुःर्सिमा पुर्वेस - ३० फुटाचा रोड, पश्चिमेस आनंद नगर, दक्षिणेस भगवान रावीकर यांचा प्लॉट नं. २६ आणि उत्तरेस उध्दव मुक्कावार यांचा प्लॉट नं. २८ येणेप्रमाणे वरील चतुः सिर्मेच्या आतील मिळकतीचे माझे पक्षकार व त्यांचा मयत भाऊ भाऊ अर्जुन यांचे कायदेशिर वारस आणि माझे पक्षकाराच्या बहिणी (२) हे संयुक्तीक मालक व कब्जेदार आहेत असे असतांनाही माझे पक्षकाराचा दुसरा भाऊ नारायण मारोती वट्टमवार यांनी यापुर्वी सदर मिळकत विकी करण्याचा ठराव विविध लोकांशी केलेला असल्याने ते सदर मिळकतीवर ताबा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. नारायण मारोती वट्टमवार यांनी दिवाणी दावा नं. १५९/२०१४ (जुना) ४१/२००२ (नवीन) मध्ये सदरची मिळकत ही एकत्रित कुटूंबाचे असल्याचे मान्य केल्याने मे. न्यायालयाने सदर दाव्यात तसा आदेशही पारीत केलेला आहे. तरी वर नमुद सदर मिळकतीबाबत कोणीही कोणाशीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये तसेच सदर मिळकतीवर कसल्याही प्रकारचा बेकायदेशिर ताबा घेण्याचा प्रयत्न करु नये. कारण याबाबत माझे पक्षकारांनी संबंधित विविध कार्यालयात याबाबत पुर्वसूचना नोटीस/अर्ज ही दाखल केलेला आहे. याउपरही सदर मिळकतीवर कोणी कसल्याही प्रकारचा ताबा घेण्याचा अथवा सदर मिळकतीस इजा पोहोंचविण्याचा प्रयत्न केल्यास व त्यातून कांही प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधितावर राहील याची नोंद घ्यावी. तसेच यानंतर होणाऱ्या प्रत्येक कार्यवाही तोच जबाबदार राहील तसेच होणाऱ्या खर्चाची सर्वस्वी जबाबदारी ही संबधितावरच राहील याची नोंद घ्यावी. म्हणून सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक : ११-०४-२०२४

जाहीर प्रगटन देणार
रंगनाथ पिता मारोती वट्टमवार
रा. उदगीर ता.उदगीर जि.लातूर

तर्फे
अॅड. बाळासाहेब पी. नवटक्के
मो. नं. ८६२४०२८५७१

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २९३/२०२४ निशाणी क्रमांक ०६

ज्याअर्थी नामे Rukminbai W/o. Digamber Kamble हे दिनांक २२/०२/२०२४ रोजी Udgir Tq. Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार येथे मयत झाले आहेत.
1) Lata W/o Vishwanath Waghmare, Age: 40 years, Occu.-House Hold,
2) Panchshila W/o Gautam Banate , Age: 38 years, Occu.-House Hold,
3) Anita W/o Datta Suryawanshi, Age: 36 years, Occu.-House Hold,
4) Meena D/o Digamber Kamble, Age: 34 years, Occu.-House Hold,
5) Savita W/o Suresh Kamble, Age: 40 years, Occu.-House Hold,
6) Sumit S/o Suresh Kamble U/g his natural mother i.e. Savita Suresh Kamble Age: 16 years, Occu.-Education,
7) Supriya Suresh Kamble, Age: 19 years, Occu.-Education,
8) Sanjana D/o Suresh Kamble, Age: 21 years, Occu.-Education,
9) Rupali W/o Manoj Kamble, Age: 34 years, Occu.-House Hold,
10) Mansi D/o Manoj Kamble U/g her natural mother i.e. Rupali Manoj Kamble Age: 11 years, Occu.-Education,
11) Manshvi D/o Manoj Kamble U/g her natural mother i.e. Rupali Manoj Kamble Age: 11 years, Occu.-Education,
All R/O. GANDHINAGAR, UDGIR TQ. UDGIR DIST. LATUR
यांनी खालील नमुद ११ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Lata W/o Vishwanath Waghmare | 40 | Daughter |
| 2) | Panchshila W/o Gautam Banate | 38 | Daughter |
| 3) | Anita W/o Datta Suryawanshi | 36 | Daughter |
| 4) | Meena D/o Digamber Kamble | 34 | Daughter |
| 5) | Savita W/o Suresh Kamble | 40 | Daughter in law |
| 6) | Sumit S/o Suresh Kamble | 16 | Grandson |
| 7) | Supriya Suresh Kamble | 19 | Granddaughter |
| 8) | Sanjana D/o Suresh Kamble | 21 | Granddaughter |
| 9) | Rupali W/o Manoj Kamble | 34 | Daughter in law |
| 10) | Mansi D/o Manoj Kamble | 11 | Granddaughter |
| 11) | Manshvi D/o Manoj Kamble | 11 | Granddaughter |

अर्जदार याने Rukminbai W/o. Digamber Kamble या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Rukminbai W/o. Digamber Kamble यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक १२/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख १३/०६/२०२४ आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे)
कनिष्ठ लिपिक
सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एस.एम.शेटे)
सहा.अधिक्षक,
सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर









**उदगीर मनोरंजन**

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२१५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# देगलूर येथे मुख्य निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी घेतली आढावा बैठक



देगलूर (प्रतिनिधी) : देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघात आज

देगलूर तहसील येथे निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी विविध विभागातील प्रमुखांची आढावा बैठक घेतली.

नांदेड लोकसभा-१६ निवडणुकीसाठी मुख्य निरीक्षक म्हणून सह सचिव ऊर्जा मंत्रालय (भारत सरकार) नवी दिल्ली येथील शशांक मिश्रा (आयएस) यांनी आज दुपारी ३ वाजता देगलूर येथील तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली.यात सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

देगलूर - बिलोली(९०) विधानसभा मतदारसंघाचा येथील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी सचिन गिरी यांच्याशी चर्चा करत निवडणूक विभागाचा आढावा घेतला आणि सूचना दिल्या.

प्रारंभी मिश्र यांचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन गिरी , तहसीलदार राजाभाऊ कदम,नायब तहसिलदार संजय नागमवाड यांनी स्वागत केले.

मुख्य निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी प्रत्येक विभाग प्रमुखांना प्रश्न विचारत आढावा घेतला आणि महत्वाच्या सूचना दिल्या. देगलूर - बिलोलि विधानसभा मतदार संघातील संवेदनशील मतदान केंद्र, आदर्श मतदान केंद्र , पोलीस स्थानकातील गुन्ह्यांची माहिती घेतली.

सदरील बैठकीत सहायक निवडणूक अधिकारी सचिन गिरी यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांना पीपिटी द्वारे देगलूर - बिलोली मतदार संघातील निवडणूक संदर्भातील माहिती दिली. या आढावा बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, तहसीलदार राजाभाऊ कदम,बिलोली तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक विश्र्वनाथ झुंजारे, देगलूर गटविकास अधिकारी शेखर देशमुख, बिलोली गटविकास अधिकारी श्रीनिवास पदमवार, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार संजय नागमवाड, नायब तहसीलदार रघुनाथसिंह चौहाण, नायब तहसीलदार राम पंगे, देगलूर नपा मुख्याधिकारी तानाजी चव्हाण , राज्य उत्पादन शुल्क अधिकारी आशिष महिंद्रकर,मीडिया कक्षाचे सहायक नरहरी कोलगाणे,शिवानंद स्वामी, प्रा.महेश कुडलीकर,प्रा. संतोष मठदेवरू,विजय शिकारे,स्वीप कक्ष प्रमुख बालाजी कतुरवार,आदी उपस्थित होते .

# दरोडा व लुटीच्या मालासह ३ आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात



धारशिव दि.१२ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील मालाविषयक गुन्ह्यातील आरोपीची माहिती काढून चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक श्री. गौहर हसन. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, सपोनि अमोल मोरे, सपोनि सचिन खटके, पोहेकॉ विनोद जानराव, पोहेकॉ निंबाळकर, पोहेकॉ वाघमारे, पोहेकॉ सय्यद, पोना जाधवर, पोना जाधवर, पोकॉ अरसेवाड, पोहा बांगर, पोहा टेळे यांच्या पथक मालाविषयक गुन्ह्यातील आरोपींची माहिती काढीत असताना दि. ११ एप्रिल रोजी पथकास गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, कळंब पोलीस ठाण्यात गुरनं १६८/२०२४ कलम ३९४ हा गुन्हा अमोल नाना काळे रा. कनेरवाडी पाटी यांनी व त्याचे साथीदारांनी केला आहे.

तो सध्या एका झाडाखली लपून बसला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन पथकाने लगलीच कनेरवाडी येथे जावून आरोपीचा शोध घेत असताना एका इसम झाडाखाली बसलेले पथकास पाहून पळून जत असताना पथकाने त्यास शिताफिने ताब्यात घेवून त्याचे नाव गाव विचारले असता त्यांने त्याचे नाव अमोल नाना काळे, वय २३ वर्षे रा. कन्हेरवाडी पाटी असे सागिंतले. त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांनी प्रथमत: पोलीसंना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यास अधिक विश्र्वासात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, मी व माझे अमोल नाना काळे, वय २४ वर्षे, राहुल कालीदास काळे, वय २२ वर्षे, अतुल कालीदास काळे तिघे रा. कन्हेरवाडी पाटी ता. कळंब जि. धाराशिव यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेली रोख रक्कम, दोन गॅस टाक्या, मोटारसायकल, ६० लिटर डिझेल असा एकूण ८० हजार ८१ किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन त्याची खात्री करता ती कळंब पोलीस ठाण्यात गुरंन १६८/२०२४, कलम ३९४, ३४, गुरनं १४०/२०१४, कलम ३९५, वाशी पोलीस ठाणे गुरनं ७०/२०२४ कलम ३७९, गुरनं१०२/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि.सं. या गुन्ह्यातील असल्याची खात्री झाली. तसेच आरोपी अमोल काळे, राहुल काळे हे कळंब पोलीस ठाणे गुरनं ४३६/२०२३ कलम ३९५, पोलीस ठाणे धाराशिव ग्रामीण गुरनं ३२/२०२४ कलम ३९२ मध्ये पाहिजे आरोपी आहेत. तसेच पोलीसांनी त्यांच्या ताब्यातून माल हस्तगत करुन नमुद तीन आरोपीस चोरीच्या मालासह कळंब पोलीसांच्या ताब्यात दिले. ही कामगीरी सथानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, पोहेकॉ विनोद जानराव, समाधान वाघमारे, अमोल निंबाळकर, हुसेन सय्यद, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, पोलीस अमंलदार रविद्रं आरसेवाड, मपोहकॉ शोभा बांगर, शैला टेळे यांच्या पथकाने केली आहे.

# खा राजेनिंबाळकर व आ. पाटील यांनी केले फुले यांना अभिवादन



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरातील महात्मा फुले चौकात खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ कैलास पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

धाराशिव शहरातील महात्मा फुले चौकात जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमास महादेव माळी, पृथ्वीराज चिलवंत, मसुद शेख, सोमनाथ गुरव, रवि कोरे, पंकज पाटील, चंद्रशेखर सुरवसे, सचिन चौधरी, अमर माळी, चंद्रशेखर सुरवसे, सौदागर गोरे, दत्ता गोरे माळी,बळीराम माळी ,चंद्रकांत गोरे ,गोविंद गोरे, भास्कर गोरे, बाळू माळी, किशोर माळी, राजाभाऊ माळी, लक्ष्मण माने, सचिन दिलपाक आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जेतवन कॉलनीमध्ये महात्मा फुले यांना अभिवादन

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त जेतवन कॉलनीत दि.११ एप्रिल रोजी अभिवादन करण्यात आले.

धाराशिव शहरातील शाहु नगरातील जेतवन कॉलनीत हा कार्यक्रम घेण्यात आला. आनंद नगर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस सपोनि घाडगे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी रिपाइं (आ) चे जिल्हाध्यक्ष राजरत्न शिंगाडे यांनी भारतीय संविधान देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सोमनाथ वाघमारे, राम चंदनशिवे, अशोक हजारे, बाळासाहेब माने, सुधीर गायकवाड, कमलाकर गायकवाड, महेंद्र चंदनशिवे, राम वावळकर, भारत शिंदे, रमाकांत गायकवाड, भागेश वाघमारे, महेश वाघमारे, कुमार कांबळे, नंदु हजारे, विकी शिंदे, गणेश फडके, धीरज शिंदे, निलेश विधाते, रोहन कटारे, सुबोध शिंगाडे आदींसह नागरिक मोठ्या उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात इंजीनियरिंग प्रवेश मार्गदर्शन मेळाव्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



लातूर / प्रतिनिधी- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सीईटी सेलच्यावतीने बारावी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग प्रवेश मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून एमआयटी (पुणे) येथील सहयोगी प्राध्यापक आशिष शिवकुमार उटगे, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, सीईटी सेलचे समन्वयक प्रा. नितीन वाणी यांची यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. आशिष उटगे म्हणाले की, इंजिनिअरिंग शाखा ही ज्ञानाचे महत्त्व व मर्यादा सांगणारी आहे. भारत देश हा सर्वच क्षेत्रात नोकरी देणारा एकमेव देश आहे. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासोबतच इंजिनिअरिंग शाखा ही व्यवस्थित काम देणारी शाखा आहे. विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग शाखेचा अभ्यास करताना प्रचंड मेहनत व अभ्यासामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे मणले की, संपूर्ण इंजिनिअरिंग क्षेत्राचा लेखाजोखा विद्यार्थ्यांसमोर मांडला. मरीन इंजीनियरिंग, रोबोट इंजिनिअरिंग, बायो इंजीनियरिंग, मेडिकल इंजिनिअरिंग यासारख्या महत्त्वपूर्ण इंजिनिअरिंग क्षेत्राचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ .संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नेहमी आपल्या आई वडिलांच्या कष्टांचे स्मरण करावे. आई-वडिलांना सतत आपल्या डोळ्यासमोर ठेवूनच अभ्यास करावा. गरिबी ही माणसाला कष्ट करण्याचे महत्त्व सांगून जाते. नव्या पिढीने भ्रमणध्वनी पासून दूर राहावे व आपले ध्येय साध्य होईपर्यंत सातत्याने प्रयत्न, चिकाटी व जिद्द ठेवून अभ्यास करावा असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नितीन वाणी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. के. आर. सूर्यवंशी यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश वाडकर, अनिल कोळ्ळे, शुभम बिराजदार, भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून

### लोकसभा...

मतदानामध्ये किमान डिस्टींगशन गाठण्याचा प्रयत्न आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने ज्या तक्रारी येतात त्या तक्रारींचा तत्काळ निपटारा केला जात आहे.

आतापर्यत २५ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यातील १७ तक्रारींत तथ्य आढळून आले नाही तर इतर तक्रारी या मालमत्तेशी संबंधीत होत्या. आजघडीला एकही तक्रार प्रलंबीत नाही. लातूर लोकसभेची निवडणुक भयमुक्त आणि पारदर्शक व्हावी, या दृष्टीने सर्व यंत्रणा कामाला लागली आहे. बांबुचा वापर करुन पर्यावरणपुरक मतदान बुथ असणार आहेत. परदानशीनही बुथ असणार आहेत, असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी वर्षा ठाकुर-घूगे म्हणाल्या. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाभरात केलेल्या कारवाईची माहिती दिली. लातूर जिल्ह्याला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा लागुन असल्यामुळे लातूर-बीदर पोलीस समन्वयाने कामकाज करीत आहेत. त्या अनुषंगाने विविध ९ बॉर्डर पॉइंटवर वाहनांची चोख तपासणी केली जात असल्याचे नमुद करुन आजपर्यंत केलेल्या कारवाईची माहिती दिली.

### रामेश्वरम...

१२ एप्रिल रोजी सकाळी फरार आरोपी अब्दुल माथिन ताहा आणि मुसाविर हुसेन शाजेब हे कोलकाताजवळ दिसले होते. दोन्ही आरोपी आपली ओळख लपवून कोलकात्यात राहत होते.गेल्या महिन्यात एनआयएने या दोन आरोपींची माहिती देणा-यास प्रत्येकी १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

### दोन जागांवरून...

अमित शहांना प्रत्युत्तर

राज्यात दोन नकली पक्ष, एक शिवसेना दुसरी राष्ट्रवादी असे म्हणत अमित शाहांनी उद्धव ठाकरे आणि पवारांना डिवचले. यावरून जयंत पाटलांनी शाहांना प्रत्युत्तर दिले आहे. एका पक्षाचे दोन तुकडे करायचे आणि आपणच त्याला नकली म्हणायचे. आता जनतेलाच ठरवू दे कोण नकली आणि कोण असली, असा टोला जयंत पाटलांनी लगावला. तर २०१९ साली पाठिंबा मागण्यासाठी मातोश्रीवर नाक रगडत का आला होता? असा सवाल संजय राऊतांनी विचारला. शाहांनी डुप्लिकेट पक्ष स्थापन केलेत त्याचा निकाल जनता लावल्याशिवाय राहणार नाही असा पलटवार राऊतांनी केला आहे.

### काँग्रेस...

पुढच्या काही वर्षांत काँग्रेस पक्ष डायनासोरप्रमाणे लुप्त होऊन जाईल. काँग्रेस नेते रोज एक-दुसऱ्याशी लढत आहेत. टीव्ही शो बिग बॉसप्रमाणे ते एकमेकांचे कपडे फाडत आहेत, असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी जाहीर सभेत म्हटले.

### अवकाळी...

तर उर्वरित विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात ङ्गयेलो अलर्टफ देण्यात आला आहे.

### हरंगुळ :विद्यार्थिनीच्या...

असुरक्षिततेची भावना आहे, पुणे येथील रायसोनी महाविद्यालयात अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना भाग्यश्री हुशार विद्यार्थीनी म्हणून ओळखल्या जायच्या. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुडे कुटुंबियांच्या भावना आम्ही लेखी स्वरुपात दिल्या आहेत.

सुडे कुटुंबियांच्या भावनाशी आम्ही एकरूप आहोत, कुटुंबीयांच्या मनात संशय आहे, अटक झालेल्या आरोपीच्या मागे आणखी कोणी आहे का, हे पाहण्यासाठी हे प्रकरण सीबीआयला देण्यात यावे, या प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषींना कडक शिक्षा झाली पाहिजे. या प्रकरणात कुठलेही राजकारण कोणी करू नये असे सांगून त्यांनी जोपर्यंत भाग्यश्री सुडे यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही सर्वजण सुडे कुटुंबीयांसोबत आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली.

माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, विद्यार्थिनी भाग्यश्री सुडे खून प्रकरण हे अत्यंत दुर्दैवी घटना आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घोषणा करून फास्टट्रॅक कोर्टात, हे प्रकरण चालवले जाईल त्यासाठी उज्वल निकम वकील म्हणून मिळतील, असे सांगितले. अशा घटना पुन्हा घडू नयेत ९ जुलैच्या अधिवेशनात मी आमदार अमित देशमुख, आमदार अभिमन्यू पवार, विधानसभेच्या पायरीवर बसू सर्व मागण्या मान्य करून घेऊ असे त्यांनी सांगितले.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, आमच्या लातूरच्या लेकीला न्याय मिळाला पाहिजे पुणे व लातूर हे शिक्षणाचे माहेरघर आहे. पुणे येथे ही घटना घडणे, काळीमा फासणारे आहे. आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या कानावर हे प्रकरण घातले आहे, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला जाईल, वकील उज्वल निकम यांना हे प्रकरण द्यायला उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी होकार दिला आहे. सरकारने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे, आरोपी सुटणार नाहीत असे सबळ पुरावे आहेत, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत म्हणून पावले उचलली जातील सरकारवर आपण विश्वास ठेवावा, हा विषय राजकारणाशी जोडू नये, हा लातूरकरांचा विषय आहे, आम्ही सगळे सुडे कुटुंबीयांसोबत आहोत असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर शहर भाजपा अध्यक्ष देविदास काळे, डी. एन. शेळके, स्वाती जाधव, श्याम बरुरे, रामचंद्र तिरुके यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थिनी भाग्यश्री सुडे हिला न्याय मिळावा अशी मागणी केली.

### जग पुन्हा...

दिवसांपूर्वी हल्ला झाला होता. या हल्ल्यात इराणचा एक सर्वोच्च जनरल आणि सहा लष्करी अधिकारी ठार झाले. या हल्ल्याचा सूड घेण्याचे वचन इराणच्या नेत्यांनी दिले होते. इस्रायलच्या हवाई दलाने १ एप्रिल रोजी दमास्कसमधील इराणच्या वाणिज्य दूतावासावर हल्ला केला होता. ज्यामध्ये इराणी अधिकारी मारले गेले.


**CHANGE OF NAME**

I have changed my name from PATEL AAYESHA RAFIK to PATEL AYESHA SARFARAZ Hence for this declaration. And in future I will use my new name PATEL AEYSHA SARFARAZ. Also, in future the same name will be used by my family.

**Old Name :** PATEL AAYESHA RAFIK

**New Name : PATEL AYESHA SARFARAZ**

**Address :** MANNAT, AYESHA COLONY, KHORI GALLI, LATUR - 413512. MAHARASHTRA.

**DECLARATION:CHANGE OF NAME**

I have changed my name from PATHAN RASUL KHAN KASIM KHAN to PATHAN RASULKHAN KASIMKHAN Hence for this declaration. And in future I will use my new name PATHAN RASULKHAN KASIMKHAN. Also, in future the same name will be used by my family.

**OLD NAME**

PATHAN RASUL KHAN KASIM KHAN

**NEW NAME**

PATHAN RASULKHAN KASIMKHAN

**ADDRESS**

OPP ALAMPURA MASJID, ALAMPUARA, LATUR - 413512, MAHARASHTRA.

**सुर्य कल्याण मुंबई रात्र**

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार

**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | | ३६-६७ | | ८०-०४ |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | | ०१-१४ | | ७८-८६ |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी

संपर्क करा

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा-९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26

दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





# यशवंत

शनिवार दिनांक १३ एप्रिल २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# कर्ज व नापिकीला कंटाळून वांजरवाडा येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**जळकोट (प्रतिनिधी)** वांजरवाडा येथील शेतकरी रामदास प्रभाकर जानापूरे ( वय ४६ वर्षे ) यांनी चिंचेच्या झाडाच्या फफ्रांदीला दोरी बांधून गळफफ्रास घेऊन आत्म हत्या केली. ही घटना जळकोट तालुक्यातील मंगरुळ शिवारात ता. १२ रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आला.

मयताची वांजरवाडा शिवारात गट नं. २५० मध्ये १ हेक्टर ९४ आर जमीन आहे. त्या पैकी काही जमीन चेरा साठवण तलावात गेली होती. परंतू संपादीत केलेल्या जमीनीचा मावेजा म ोबदला मिळाला नव्हता. त्यामुळे ते सतत आर्थिक विवंचनेत आसायचे तसेच एका सहकारी बँकेचेही मयताच्या नावे कर्ज आहे. शिवनखेडला जायचे असे नाव सांगुन



दोन दिवसापूर्वी घरुन गेले होते. त्यानंतर म ंगरुळ येथील शिवारातील एका चिंचेच्या झाडाच्या फफ्रांदीला दोर बांधून गळफफ्रास लावून आत्म हात्या केल्याचे दिसून आले. तसेच मजुरी शिवाय कोणतेही उत्पन्ना- चे साधन नसल्याचेही मयताचा मुलगा निवृत्ती रामदास जानापूरे यांनी सांगितले.

त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने वांजरवाडा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतकाचा मुलगा निवृत्ती रामदास जाना- पूरे यांनी पोलीस ठाण्यात फिफ्रर्याद दिली असून जळकोट पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पुढील तपास जळकोट पोलीस करत आहेत.

# प्रा.डॉ.बळीराम भुक्तरे यांना आयसीएसएसआर चा मेजर रिसर्च प्रोजेक्ट मंजूर

**हेर (प्रतिनिधी)** उदगीर- येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.बळीराम संभाजी भुक्तरे यांना इंडियन काउंसिल ऑफ्फ सोशल साइंस रिसर्च यांच्यातफर्फे दक्खिनी हिंदी भाषा साहित्य मे व्यक्त संस्कृती एवं समाज का अनुशी- लन या विषयावर बृहत शोध प्रकल्प (मेजर रिसर्च प्रोजेक्ट) मंजूर झाला आहे. त्यांचा हा प्रकल्प कला शाखेतील महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रकल्प असून त्यासाठी त्यांच्या टीम ला आय.सी.एस. एस आर.आर. नवी दिल्ली ने ५५ लाख रुपयाचे अन- ुदान दोन वर्षासाठी दिले आहे. दक्षिण भारतातील दकब दक्षिणी हिंदीचे ते या प्रकल्प अंतर्गत सर्वेक्षण करणार आहेत. ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे हिंदी विषयाचे संशोधक मार्गदर्शक आहेत ,त्यांच्या म ार्गदर्शनाखाली आतापर्यंत पाच विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केली आहे सहा विद्यार्थी कार्यरत आहेत तसेच यशवंतराव



चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक चे ते एम .फ्फील. चे म ार्गदर्शक आहेत. त्यांनी आत्तापर्यंत तीन लघुश- ोध प्रबंध पूर्ण केलेले आहेत त्यांचे सहा पुस्तके प्रकाशित झाले- ली आहेत. शासकीय म हाविद्यालय गुलबर्गा येथे पदवी स्तरावर ते हिंदी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. यूजीसी कडून अनुदान प्राप्त राष्ट्रीय स्तरावरची दोन दिवसाची परिषद त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. प्राध्यापक संघटना अंधश्रद्धा निर्मूलन समिति. सांस्कृतिक समिती तसेच परिवर्तनवादी चळवळीत ते सक्रिय कार्यरत आ- हेत. त्यांचा महाराष्ट्र युवा महोत्सव २०२३ मध्ये सक्रिय सहभाग होता. म हाविद्यालयाच्या विविध समितीमध्ये ते कार्यरत असतात. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना नॅशनल टॅलेंट अवॉर्ड नागपूर,राष्ट्र ीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचा राष्ट्र पिता महात्मा ज्योतिराव फ्फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर चा शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे त्यांच्या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ.रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ.रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील, महाराष्ट्रातील प्रसिद्ध हिंदी समीक्षक डॉ सूर्य नारायण रणसुभे, डॉक्टर नरसिंह प्रसाद दुबे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# श्यामार्य कन्या विद्यालयात घे भरारी आनंददायी पायाभूत अभ्यासक्रम वर्गाचे उत्साहात उद्घाटन




**उदगीर (प्रतिनिधी)** श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था द्वारा संचलित उदगीर मधील मुलींसाठी चालणारी एकमेव श्याम ार्य कन्या विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचे भावविश्व घडविण्यासाठी दरवर्षीप्रम ाणे यावर्षीही वर्ग ५ वी ते ९ वी या वर्गासाठी दिनांक १२ एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत

घे भरारी आनंददायी पायाभूत अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन शामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य यांच्या हस्ते करण्यात आले.

या कालावधीमध्ये पुढील शैक्षणिक वर्षाम धील मराठी, गणित, इंग्रजी व विज्ञान या विषयाचे पायाभूत अभ्यासक्रमाचे वर्ग आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व तसेच सर्वगुण संपन्न बनवण्यासाठी सुंदर हस्ता- क्षर, चित्रकला, संस्कारपर बोधकथा, संस्कारपर बालचित्रपट, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे , ओरिगाम ी, स्पोकन इंग्लिश डेम ो, संगीत, विविध मैदानी खेळ, नृत्य, नियमितपणे प्राणायाम, वैदिक श्लोकचे पाठांतर इत्यादी नवोपक्रम ाचे आयोजन श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, सहसचिव अंजुमनीताई आर्य, मुख्याध्यापिका तृप्ती पंडित यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे प्रास्ताविकाम धून श्रीहरी निडवंचे यांनी माहिती दिली.

बालपणा- तील अनुभवांच्या विस्तृत श्रेणीचा परिणाम सर्वांगीण विकसित प्रौढ व्यक्तीम ध्ये होतो. घे भरारी या आनंददायी नवोपक्रमांतर्गत मुलांना इतर मुलांबरोबर, अगदी वेगवेगळ्या पार्श्वभूम ीतील मुलांबरोबरही एकत्र येण्याची संधी असते. मुलांसाठी एक महत्त्व म्हणजे व्यवस्थापित आणि सुरक्षित वातावरणात वेगवेगळ्या वयोगटातील मुलांशी आणि शाळांशी संवाद साधण्याचे स्वातंत्र्य. जर मुलांना संगीत, नृत्य, संगणक किंवा चित्रकला यासारख्या विशेष उपक्रमात पाठवले तर त्यांना त्यांची कौशल्ये वाढवण्याची आणि त्यात प्राविण्य मिळवण्याची संधी मिळते, ज्यामुळे भविष्याचा पाया रचला जातो. तरी नियमितपणे सर्व विद्यार्थ्यांनी शंभर टक्के उपस्थित राहून शंभर टक्के लक्ष देऊन आपल्या ज्ञानात व कौशल्यात भर टाकावी असे उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संस्थाअध्यक्ष सुपोषपाणी आर्य यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या उपक्रमाचे आयोजन फ्फक्त एका विद्यालयापुरते मर्यादित न ठेवता सर्व विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी हे शिबिर खुले ठेवण्यात आले- ले आहे. मोबाईल, टीव्ही, इलेक्ट्रॉनिक म ीडियापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी इच्छुक पालकांनी व विद्यार्थ्यांनी या संधीचा फ्फायदा घ्यावा असे श्यामार्य कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तृप्ती पंडित यांनी आवाहन केले आहे.

उद्घाटन प्रसंगी नवोपक्रमाअंतर्गत संस्कारपर बोधकथा श्री सतनप्पा हुरदळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी निडवंचे तर आभार पर्यवेक्षक प्रवीण भोळे यांनी मानले.

# क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याकडून निलेवाड कुटूंबियांचे सांत्वन



**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील लोहा- रा-उदगीर रस्त्यावरील दुध डेअरीजळ बुधव- ारी दि.१० एप्रिल रोजी दुपारी पावणे एकच्या सुमारास करडखेलकडे जात असलेल्या एका दुचाकीला डस्टर गाडीने धडक दिल्याने अपघात झाला होता. या अपघ- ातात अनुपवाडी (ता. उदगीर) येथील विशाल भिवा निलेवाड (वय- २२) व आकाश धोंडीबा निलेवाड (वय-२३) या दोघा चुलत भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेने माहिती क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांना समजताच त्यांनी अनुपवाडी येथे निलेवाड कुटूंबियांची भेट घेव- ुन सांत्वन करुन धीर दिला.

यातील म यत विशाल निलेव- ाड यांचे १८ एप्रिलला लग्न होते. लग्नाच्या पत्रिका देण्यासाठी ते करडखेल येथे जाण- ार होते. करडखेल येथे जाण्याआधीच त्यांना लोहाऱ्या जवळ काळाने घाला घातला आहे.

यावेळी माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, तालुका अध्यक्ष बाल- ाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, रोहिदास कुंडगीर, अनुपवाडीचे सरपंच सलगरे रामेश्वर यांच्यासह प्रतिष्ठीत ना- गरीक उपस्थित आदी उपस्थित होते.

# जळकोट तालुक्यात जिल्हा आरोग्याधिकारी यांची अचानक भेटी ; कर्मचाऱ्यांची धावपळ



**जळकोट (माधव हो- नराव)** लातूर जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे यांची जळकोट तालुक्यातील वांजरवाडा, जळकोट ,आतनूर या प्राथमिक आरोग्य केंद्रसह इतर लहान उपकेंद्रांना अचानकपणे भेटी देऊन त्यांनी रुग्णाची व औषध उपचारा संदर्भात औषध उपचार उपलब्ध आहे किंवा नाही उष्माघाता संबंधी मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी ता. १० मार्च रोजी भेट दिली.

जळकोट तालुक्यातील वांजरवाडा , जळकोट , आतनुर वडगाव, येलदरा व अन्य गावामध्ये डॉ. हणमंत वडगावे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राना भेटी देऊन उष्माघातासंबंधी औषध उपलब्ध आहेत किंवा नाही याची माहिति घेत- ली. सर्व डॉक्टरांची बैठक घेऊन उष्माघात व इतर आजाराविषयी मार्गदर्शन केले. सध्या तापमान वाढले असून उष्माघा- तावर उपचार कसे करावे, मजूरदार व कष्टकऱ्यांना म ार्गदर्शन करण्याच्या सूचना केल्या. मधुमेह, कॅन्सर, रक्तदाबमुक्त गाव करण्याची प्रशासनाची भूमिका असून त्यासाठी आम्ही हे अभियान राबवत असल्याचे सांगून वांजरवाडा येथे उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला. त्या ठिकाणी यासंबंधीचा औषध उपच- ार केला जाईल, त्याचा लाभ रुग्णांनी घ्यावा असे आव्हान त्यांनी यावेळी केले. या उष्माघात कक्ष , पिण्याचे मुबलक पाणी, औषध पुरवठा व डॉक्टर मंडळीची नेमणूक करण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी त्यांच्यासोबत जळकोटचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय पवार, डॉ. एम व्ही बिरादार, डॉ. सुरेश बेटकर , डॉ. महेश केंद्रे आदी उपस्थित .

# लाल बहादुरशास्त्री विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश



**उदगीर (प्रतिनिधी)** श्री समर्थ विद्यापीठ सा- तारा अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये लालबहादूर शास्त्री चे उत्तुंग यश.या परीक्षेत आठवीतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यातून सर्वप्रथम आर्या ही दयासागर जाधव, द्वितीय संध्या सिद्धार्थ बोडके, तृतीय गायत्री वीरभद्र तोगरगे.यशश्वी झाले.यशश्वी विद्यार्थिनींना मिडल, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले,विद्यालयाचे म ुख्याध्यापक मा. श्री अंबादासराव गायकवाड सर व परीक्षा प्रम ुख डॉ.श्रद्धा पाटील यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.विद्यालयाचे मुख्याध्यापक म ा. अंबादासरावजी गायकवाड , उप म ुख्याध्यापक संजय कुलकर्णी ,पर्यवेक्षक श्री मारावार,श्री मठ्ठव- ाले, श्री सन सन्मुखे तसेच स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष श्री मधुकरराव वट्टमवार,श्री शंकरराव लासुणे,माध्यमि क शालेय समिती अध्यक्ष सतनप्पा हुरदळे सर्वांनी विद्यार्थ्यांची अभिनंदन व कौतुक केले

# ऋषिकेश कुमठेकर ऑस्ट्रलियातील मेलबोन येथे रवाना



**उदगीर (प्रतिनिधी)** बामणी येथील रहिवासी निवृत्त शिक्षक यशवंत राम राव कुमठे यांचे चिरंजीव ऋषिकेश कुमठेकर हे शुक्रवारी ऑस्ट्रेलियातील मेलबोन येथे बिझनेस मीटिंगसाठी रवाना होण- ार आहेत. ऋषिकेश यांचे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर येथे झाले. त्यांनी पॉलीटेक्निक डिप्लोमा राजीव गांधी पॉलिटेक्निक कॉलेज येथून पूर्ण केले. पॉलिटेक्निक नंतर त्यांनी बी. ई .इंजीनियरिंग ( मेकॅनिकल) मध्ये पुणे युनिव्हर्सिटीमधून संपादन केले. बी ई.नंतर त्यांनी मेघा इंजीनियरिंग औरंगाबाद येथे दोन वर्षाचा अनुभव घेतला नंतर त्यांनी कॅपजेमिनी या कंपनीत कन्सल्टंट म्हणून नोकरी करत आ- हेत .त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रसन्न होऊन कंपनीने त्यांना बिजनेस मीटिंग साठी ऑस्ट्रेलिया मेलबोन येथे पाठवले आहे. एका साम ान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा अशी प्रगती करतो हे पाहून त्यांची सर्व स्तरा- तील लोकांकडून कौतुक होत आहे. (फ्फोटो कॅप्शन: ऋषिकेश कुमठेकर हे बिझनेस मीटिंग साठी ऑस्ट्रेलिया मेलबर्न येथे रवाना होत आहेत. त्या प्रसंगी सत्कार करताना डॉ धनाजी कुमठेकर,मोहन भंडे गुरुजी, पंडित हुरु- सणाले आणि राजू भंडे)